Regn. No. MAHMAR/2000/03666

# निर्भय आंदोलन

सामान्यांचे व्यासपीठ

वर्ष दहावे अंक ४ था मे २०१० किंमत रु. ५/-

संपादकीय

## गावे खरेच वगळली?

वसई-विरार महानगरपालिकेला सक्त विरोध करणाऱ्या गावांतील लोकांना अंगावरील पोलिसांच्या लाठीमाराचे वळ जाण्याआधीच आता त्याच महानगरपालिकेच्या निवडणूकीला सामोरे जाण्याची पाळी आली आहे. गावे वगळली, विरारच्या कचाट्यातून सोडवली सांगणारे सारे निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहेत. आता महानगरपालिकेत निवडून गेल्यावर त्यांचे नगरसेवक आतून विरोध करणार आहेत! आणि एकसारखा लाठीमार खाणारी आणि तुरुंगात खितपत पडणारी साधीभोळी सामान्य जनता पुन्हा एकदा नव्या स्वातंत्र्यासाठी मतदान करणार आहे आणि निवडून येणाऱ्या नगरसेवकांच्या सत्कारासाठी डि.जे. आणि फटाके तयार ठेवणार आहे. कुणाला महापौर व्हायचे आहे तर कुणाला विधानपरिषदेत आमदार व्हायचे आहे. स्वप्ने रंगवायला काही हरकत नाही. वेळ आली की बहुजनांच्या विकास नौकेत कसे बसायचे तेही त्यांना चांगले माहीत आहेच! कॅथोलिक बँकेचा अनुभव गाठीशी आहे. जनता मात्र धावते आहे पण पुढे काय वाढून ठेवले आहे?

मागील अंकात आम्ही संपादकीय लिहिले खरे पण तोपर्यंत अधिसूचना आणि कोर्टाचा आदेश हाती आला नव्हता! क्षणभर ३५ गावे वगळल्याचा आनंद आम्हालाही झाला पण १ एप्रिल २०१० रोजीचा मा. मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश आणि ५ एप्रिल २०१० ची अधिसूचना हाती येताच आमचा उल्हास गळून पडला. मा. उच्च न्यायालय रिट पिटीशन क्र. १७९६/२०१०, १९७१/२०१०, ९५१४/२००९ मधील आदेश म्हणतो, 'Thereafter, the objections will be duly considered by the Appropriate Authority and decision thereon will be taken not later than four weeks from the last date of submission of suggestions and objections. Recommendation of the Appropriate Authority will be then placed before the Registrar General of Census of India and **also forwarded to the Corporation to comply with the process of consultation.**' आणि ५ एप्रिल २०१० ची अधिसूचना म्हणते, ''महाराष्ट्र शासन याद्वारे वसई-विरार महानगरपालिकेशी विचारविनिमय करुन..........''

आमच्या अल्पबुद्धी प्रमाणे या दोन्हीचा अर्थ असा होतो, महानगरपालिकेची इमारत किंवा आयुक्त नव्हे तर निवडून जाणाऱ्या ८९ नगरसेवकांशी विचारविनिमय करुन ३५ गावे वगळण्याची संमती घेणे. अशी संमती घेण्याची प्रक्रिया करणे म्हणजे रितसर अजेन्ड्यावर विषय घेऊन सभागृहात चर्चा घडवून आणणे! विरार-नालासोपारा-नवघर-माणिकपूर या शहरी भागांतून निवडून जाणारे नगरसेवक अशी संमती देतील का? आणि ग्रामीण भागांतून निवडून जाणाऱ्यांपैकी काही नगरसेवकांनी जरी गावे वगळण्यास संमती दिली तरी इतरांचे काय? पाच वर्षासाठी मतदार नगरसेवकांना निवडून देतील ते ''नगरसेवकपद'' पणाला लावण्यास किती नगरसेवक तयार होतील? समजा महापालिकेतून ३५ गावातील नगरसेवकांना घरी बसवले व गावे वगळली आणि बहुसंख्य आरक्षित नगरसेवक बरखास्त झाले तर आरक्षणाचा समतोल बिघडेल त्याचे काय? कारण ग्रामीण भागात सर्वात जास्त आरक्षित नगरसेवकांचे वॉर्ड ठेवले आहेत, अनेक गावांचे वॉर्ड शहरी भागांशी जोडले आहेत हे वास्तव लपत नाही. अशाच गडबडीमुळे कल्याण महानगरपालिकेतून २७ गावे वगळण्यास अनेक वर्षे लागली.

मुंबई हायकोर्टात याबाबत प्रखर युक्तिवाद व्हायला हवा होता. गावे वगळून मगच महानगरपालिकेची निवडणूक घ्यावी असे कोर्टाला प्रभावीपणे पटवून देणारा नामवंत वकील उभा राहण्याची गरज होती. नाहीतर निवडणूक जाहिर होण्याआधी सर्वोच्च न्यायालयात अपिल (SLP) करण्याची गरज होती. १ एप्रिल ते १३ एप्रिल पर्यंत चांगली १२ दिवसाची संधी होती. ग्रामसभांचे ठराव, ग्रामीण भागांचा लोकसंख्या वाढीचा अल्प दर, अत्यल्प घनता, आरक्षित गावे, नैसर्गिक वास्तव हे सारे मुद्दे गावकऱ्यांच्या बाजूचे होते. पण दुर्दैवाने तसे घडले

# निर्भय आंदोलन

सामान्यांचे व्यासपीठ Regn. No. MAHMAR/2000/3666

## निर्भयचे संपादक मंडळ

**संपादक, मुद्रक, प्रकाशक : मनवेल तुस्कानो**
**सहसंपादक :** उदय सामंत
**सहाय्यक :** जॉन परेरा, पायस मच्याडो, प्रा. ट्रिजा परेरा
**अक्षरजुळणी :** वसई तालुका सहकारी मुद्रणालय लि., वसई रोड.
**छायाचित्र :** सरोज रॉड्रीग्ज, डेनिस डिसोजा, विजय रॉड्रीग्ज
**वेबसाईट - www.Vasaikar.org**

## निर्भयला हक्काची मदत

| | | |
|---|---|---|
| पॅट्रीक फर्नांडीस, मुळगांव | रु. | २,०००/- |
| विल्यम कोरीया, केदार-नंदाखाल | रु. | १,०००/- |
| पायस मच्याडो, नंदाखाल | रु. | १,०००/- |
| सिल्वेस्टर फिलीप लोपीस, आगाशी | रु. | ५००/- |
| अनामिक, अर्नाळा | रु. | ५००/- |
| सुनिल डिमेलो, पालमार-रमेदी | रु. | ५००/- |
| बार्थोल डिमेलो, पाली | रु. | ३००/- |
| अनंत राऊत, वसई | रु. | ३००/- |
| जॉनी मिनेजीस, माणिकपूर | रु. | २५०/- |
| सिमा जो. घोन्सालविस, माणिकपूर | रु. | २५०/- |
| नेविल डिसोजा, माणिकपूर | रु. | २५०/- |
| जॉन अंतोनी घोन्सालविस, माणिकपूर | रु. | २५०/- |
| क्लेमेन्ट मायकल डिसोजा, माणिकपूर | रु. | २५०/- |
| सुधीर जॉन लोपीस, माणिकपूर | रु. | २५०/- |
| फ्लॅसीट मर्यान डाबरे, माणिकपूर | रु. | २५०/- |
| पास्कोल मिनेजीस, माणिकपूर | रु. | २५०/- |
| फ्रेडी मिनेजीस, माणिकपूर | रु. | २५०/- |
| स्टॅनी मिनेजीस, माणिकपूर | रु. | २५०/- |
| मॅथ्यू मार्कस कोलासो, माणिकपूर | रु. | २५०/- |
| आल्बर्ट पॉल डिसिल्वा, शिरलयवाडी | रु. | २५०/- |
| फिलीप मनवेल आल्मेडा, माणिकपूर | रु. | २५०/- |
| दत्तात्रय भास्कर राऊत, नेवर्ले-सांडोर | रु. | २५०/- |
| आल्बर्ट रोझारिओ, नाळे | रु. | २००/- |
| जॉन सेबेस्टीयन लोपीस, नवभाट-गिरीज | रु. | २००/- |
| जहूर सत्तारी, पाली | रु. | २००/- |
| सॅमसन मार्शल फरेरा, गिरीज | रु. | २००/- |
| डॉमणिक थॉमस लेमॉस, नागभाट-सांडोर | रु. | २००/- |
| जोजेफ पी. कर्व्हालो, माणिकपूर | रु. | १००/- |
| अनामिक, गिरीज | रु. | १००/- |

### वाचकांना नम्र निवेदन

मागील १० वर्षापासून आम्ही आपणास निर्भय आंदोलनचे अंक पाठवित आहोत. वृत्तपत्र चालवणे पैशाशिवाय शक्य होत नाही. म्हणून आम्ही १ जानेवारी २०१० पासून ज्या वाचकांनी वर्गणी भरलेली आहे अशांनाच अंक पाठविण्याचे ठरविले आहे. ज्या वाचकांनी वर्गणी भरली नसेल त्यांनी २०१०-११-१२ या तीन वर्षाची वर्गणी रु. २५०/- पाठवून द्यावी ही नम्र विनंती.

नाही आणि आता गावाचे भवितव्य महानगरपालिकेचे ८९ नगरसेवक ठरविणार! वास्तविक हरकती-सूचना सुनावणीची प्रक्रिया दोन वर्षापूर्वीच झाली आहे. आता थेट ३५ गावे वगळूनच निवडणूक घ्यायला हवी होती. पण दुर्दैवाने आता गावासह ८९ नगरसेवकांची महानगरपालिका स्थापन होईल. मग त्यातूनच गावे वगळण्यासाठी महानगरपालिकेची संमती घ्यावी लागेल. ती ८९ नगरसेवकांच्या मर्जीवर असणार आहे.

आम्हीच प्रोत्साहन, कार्यक्रम व प्रेरणा देऊन तयार केलेले आणि उभे केलेले नवे नेते आता आमच्यापेक्षा खूप पुढे गेल्याचे सांगतात. त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत. मात्र त्यांनी वास्तव समजून घ्यावे. 'अक्कल बडी की भैंस बडी' याचा अभ्यास करावा. मुंबई हायकोर्टाच्या आदेशावर सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा आग्रह त्यांनी आपल्या नेत्याकडे का धरला नाही? ते सांगतात ती न्यायालयीन प्रक्रिया कोणती सुरू आहे ते आता जनतेला कळले पाहिजे!

'आलिया भोगासी असावे सादर' या उक्तीप्रमाणे आम्ही पुन्हा गधाहमाली केली. कारण ते आमचे कामच ठरले आहे. जनता दल (से) आणि निर्भय जन मंचद्वारे आम्ही लोकसंख्येची घनता, लोकसंख्या वाढीचा दर, अकृषक क्षेत्र, ग्रामसभा अशा कायदेशीर मुद्यांवर महानगरपालिकेस आव्हान देणाऱ्या सूचना शासनाकडे दाखल केल्या आहेत. त्याचबरोबर हजारो नागरिकांच्या सूचना आम्ही मुदतीमध्ये दाखल केल्या. आम्ही जनतेबरोबर आहोतच कारण आमची बांधिलकी वसईच्या जनतेशी आणि भूमीशी आहे, मताशी किंवा सत्तेशी नाही! ज्या महानगरपालिकाविरोधी आंदोलने केली त्याच महानगरपालिकेची निवडणूक लढणे आम्हांला मान्य नाही. म्हणून ग्रामीण भागात व जुन्या वसई शहरात चांगले उच्चशिक्षित उमेदवार असूनही जनता दल निवडणूक लढवित नाही.

★★★

### वाचकांना विनंती

जून २०१० च्या अंकात आम्ही महानगरपालिकाविरोधी आंदोलनाची चर्चा स्पष्टपणे करणार आहोत. त्यात सह्याद्रीवर कोण काय बोलले त्याची कॅसेट शब्दबद्ध करणार आहोत. वाचकांना खालील मुद्यांबाबत त्यांना काय वाटते? त्यांच्या प्रतिक्रिया कोणाचीही भीडभाड, भिती न बाळगता निर्भयपणे लिहून ८ जून २०१० पर्यंत आमच्याकडे पाठवाव्यात.

१) वसई तालुक्यातील शांतताप्रिय ग्रामीण जनतेला एकसारखा लाठीमार, एकसारखा तुरुंगवास, जाळपोळ, तोडफोड यांची सवय होती का? ती आपली संस्कृती आहे का?

२) यापूर्वी झालेल्या अनेक आंदोलनाचा अनुभव काय होता?

३) शांतताप्रिय ख्रिस्ती समाजाची प्रतिमा डागाळली का?

४) सहिष्णूता व शांतताप्रिय आमची गावे संवेदनशील ठरावीत का?

५) निरपराध स्त्री-पुरूषांना जबर मारहाण झाली. विरार-नालासोपारा भागात ख्रिस्ती लोकांची दुकाने जाळपोळ करुन लुटली गेली, त्यांना न्याय-भरपाई कोण देणार? त्यांच्यासाठी कोणी लढणार का?

# एस एम : संयुक्त महाराष्ट्र

हे वर्ष महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. पण हा सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना आपल्या मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र कसा मिळाला त्यासाठी जे आंदोलन करावे लागले त्याचे स्वरुप काय होते व त्याचे नेतृत्व कोणी केले हा सारा इतिहास आजच्या राडा संस्कृतीच्या वातावरणात वाढणाऱ्या तरूण पिढीला उपलब्ध करून देणे जरुरीचे आहे. तसेच सध्या गाजत असलेल्या तेलंगण प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाची मिमांसा करणेही आवश्यक आहे.

आजकाल आंदोलन किंवा निषेध म्हणजे हिंसा, दगडफेक, तोडफोड, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस असेच समीकरण झाले आहे, पण संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन आक्रमक असूनही अहिंसक होते, सत्याग्रह आणि असहकाराचे स्वरूप लोकशाहीच्या चौकटीत बसणारे होते व सत्याग्रहाच्या बरोबरीनेच विधानसभेच्या निवडणुकांना सामोरे जाऊन संसदीय पद्धतीने लढा दिला होता. लोकशाहीत लोकांचा पाठिंबा असेल तर हिंसेचा वापर न करता ध्येय साध्य करता येते हेच या चळवळीने दाखवून दिले. दगडफेक, लोकांचा उद्रेक, गोळीबार वगैरे झाला नाही, असे नाही. पोलिसांच्या गोळीबाराच १०५ निरपराध माणसे मारली गेली, पण त्या वेळेस मुंबई व महाराष्ट्रातील जनता नेतृत्वहीन होती. जनतेच्या प्रतिक्षोभाला एक संघटित व अहिंसक आंदोलनाची योग्य दिशा देण्याची नितांत गरज होती. कुठलेही आंदोलन सफल होण्यासाठी कणखर, प्रामाणिक आणि कार्यक्षम नेतृत्व लागले. अशा कठीण परिस्थितीत संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करुन समितीचे सरचिटणीस या नात्याने एस. एम. जोशींनी महाराष्ट्र जनतेला नेतृत्व दिले, आंदोलनाला एक नैतिक दिशा दिली व सर्व विरोधी पक्षांची एकजूट करून संयुक्त महाराष्ट्र संसदीय आणि सत्याग्रहाच्या मार्गाने खेचून आणला आणि म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राचे एक अग्रणी शिल्पकार म्हणून एस. एम. जोशींचे योगदान फार महत्वाचे आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात भाषावार प्रांतरचना होईल, असे काँग्रेसने १९२१ साली ठरविले. भारतात जर लोकशाही राबवायची असेल तर लोकांच्या भाषेतच राज्य कारभार होणे आवश्यक आहे हा हेतू त्यामागे होता. महाराष्ट्र, आंध्र, तामिळनाडून आणि केरळ हे ब्रिटिशांच्या काळात मिश्र भाषिक प्रांत होते. मराठी, तेलुगू, तमिळ आणि मल्याळम भाषिकांना भाषावार प्रांतरचनेची फार आवश्यकता असल्याचे जाणवत होते. मराठीभाषी प्रदेश, मुंबई प्रांत, मध्य प्रदेश आणि हैदराबाद संस्थान यात वाटला गेला होता. तो शांततेच्या व वाटाघाटीच्या मार्गाने एकत्र आणावा या उद्देशाने २८ जुलै १९४६ रोजी शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन झाली. त्यात काँग्रेससह सर्व पक्ष व काही स्वतंत्र वृत्तीच्या पण महत्वाच्या व्यक्ती एकत्र आल्या होत्या.

१५ ऑगस्ट १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले आणि राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली भारताची घटना तयार करण्यासाठी घटना समिति बसली. वर उल्लेखलेल्या चार ही दक्षिणेकडील प्रांताचे घटना समितीमधील सभासद राजेंद्र प्रसाद यांच्यावर भाषावार प्रांतरचना व्हावी यासाठी दबाव आणत होते. राजेंद्रबाबूंच्या आग्रहावरून पं. नेहरूंनी प्रथम दार कमिशन नेमले. त्यांनी सादर केलेल्या अहवालावर टिका झाली. मुंबईतील मराठेतर व्यक्तींनी व संस्थांनी आम्हाला महाराष्ट्रात जायला भीती वाटते, अशी कमिशनकडे निवेदने दिली. मुंबईतील भांडवलदार व मोठे व्यापारी की जे गुजराती आणि मारवाडी होते त्यांनीही अशीच निवेदने कमिशनला दिली. स. का. पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबई काँग्रेस कमिटीने मुंबई महाराष्ट्राला देऊ नये असे निवेदन दिले. या सर्वांची नोंद घेत दार कमिशनने हा प्रश्न पुढे ढकलावा, असे सांगितले. त्यानंतर सर्वश्री जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल आणि पट्टाभी सीतारामय्या यांची कमिटी काँग्रेसने नेमली. यांनीही हा प्रश्न पुढे लोटावा, असा निकाल दिला.

या प्रश्नाकडे राज्यकर्ते गंभीरपणे बघत नाहीत हे दिसून आल्यावर तो सुटावा म्हणून आंध्रमधील गांधीवादी कार्यकर्ते पोट्टी श्रीरामुलू यांनी प्राणांतिक उपोषण केले. त्या उपोषणाकडे कुणीही गंभीरपणे पाहिले नाही. ५८व्या दिवशी म्हणजे १५ डिसेंबर १९५२ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. त्याबरोबर आंध्रमध्ये न भूतो न भविष्यती असा दंग्याचा आगडोंब उसळला. कोट्यावधी रुपयांची मालमत्ता भस्मसात झाली. त्यामुळे नेहरूंना विशाल आंध्र देत असल्याची घोषणा करावी लागली आणि ऑक्टोबर १९५३ मध्ये विशाल आंध्र अस्तित्वात आला. त्यानंतर प्रांत पुर्नरचनेसाठी फाजल अली, कुंझरू आणि पणिककर यांचे कमिशन नेमण्यात आले. त्यांनी समतोल द्विभाषिक निर्माण करण्याची योजना आखली. त्यात कच्छ-सौराष्ट्रसह गुजरात, विदर्भाशिवाय महाराष्ट्र आणि मुंबई ही राजधानी, शिवाय दक्षिणेकडचे मुंबई प्रांतात असलेले बेळगाव, कारवार, विजापूर आणि धारवाड हे जिल्हे कर्नाटकला दिले. बेळगाव व खानापूर हे तालुके मराठी असले

तरी प्रशासनाच्या दृष्टीने ते कर्नाटकात घातले.

फाकुंप कमिशनची योजना कुणालाच काय, परंतु पं. नेहरूंनाही आवडली नाही. त्यांनी ९ नोव्हेंबर १९५५ रोजी अ. भा. काँग्रेस कमिटीतर्फे त्रिराज्य योजना मंजूर करुन घेतली. मुंबई स्वतंत्र, मराठवाडा–विदर्भासह महाराष्ट्र आणि कच्छ–सौराष्ट्रसह गुजरात असे हे त्रिभाषिक राज्य होते. हे सर्व होत असताना महाराष्ट्रात प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. मुंबई स्वतंत्र ठेवून त्रिराज्य योजनेची घोषणा १६ जानेवारी १९५६ रोजी आणण्याचा प्रस्ताव केला. त्या दिवशी रात्रीपासून मुंबईत प्रचंड दंगा उसळला. मुंबई, बेळगाव, नाशिक, निपाणी वगैरे ठिकाणचे सुमारे ९० लोक मोरारजी सरकारच्या गोळीबारात ठात झाले. जखमी शेकडो झाले.

**शिवाय २१ नोव्हेंबर १९५५ रोजी समतोल द्विभाषिकावर असेंब्लीत चर्चा चालू असताना लाख-सव्वालाखांचा मोर्चा असेंब्लीवर चालून आला. त्यावेळी झालेल्या गोळीबारात १५ जण ठार व ४०० ते ५०० जखमी झाले. एस. एम. जोशी असेंब्लीच्या बाहेर आले आणि त्या मोर्चाला त्यांनी चौपाटीवर नेले. तसे झाले नसते तर प्रचंड मोडतोड आणि हिंसा व गोळीबार झाला असता. तेथे चौपाटीवर सेनापती बापटांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड सभा झाला. त्यावेळी घोषणा होती-''मुंबई, बेळगांव, कारवार, डांग, गोवा, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.''** हे जे प्रचंड गोळीबार प्रकरण झाले त्याने शंकरराव देव भांबावून गेले. त्यांनी २० जानेवारी १९५६ रोजी संयुक्त महाराष्ट्र परिषद बरखास्त केली.

तसेच काँग्रेसवाल्यांमध्ये दुफळी झाली. हिरे आणि शंकरराव देव हे परिषदेचे नेतृत्व करीत होते. त्यांच्याविरूद्ध यशवंतराव चव्हाण यांनी बंडाचा झेंडा उभारला. ते म्हणाले, की संयुक्त महाराष्ट्र की नेहरू असा प्रश्न निर्माण झाला तर मी नेहरूंच्या बाजूला जाईन. २० जानेवारी १९५६ नंतर संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन एका संघटित मार्गाने सुरू झाले. या आंदोलनाचा थोडक्यात आढावा घ्यायचा झाल्यास त्याचे चार महत्वाचे टप्पे प्रकर्षाने दिसून येतात.

**संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना :** काँग्रेसमध्ये पडलेली फूट आणि शंकरराव देवांनी बरखास्त केलेली संयुक्त महाराष्ट्र परिषद यामुळे मराठी जनता नेतृत्वहीन झाली. तेव्हा एस. एम. जोशी यांनी पुढाकार घेतला. पुण्याच्या सुवर्णकार धर्मशाळेत संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील मित्रांची बैठक घेतली. त्यात सर्वांनी एस. एम. यांचे नेतृत्व मान्य केले. त्यानंतर ६ फेब्रुवारी १९५६ रोजी केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात महाराष्ट्रातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची बैठक झाली. तेथे संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात आली व एस. एम. जोशी हे तिचे सरचिटणीस राहतील अशी घोषणा करण्यात आली.

**सत्याग्रह :** ताबडतोब ९ मार्चपासून सत्याग्रहाला सुरूवात झाली. लोकसभेमध्ये ६ ऑगस्ट १९५६ रोजी त्रिभाषिक मंजूर करण्यासाठी चर्चा चालू असताना ७ ऑगस्ट रोजी फ्रँक अँथनी, तुळशीदास किलाचंद या खासदारांनी महाद्विभाषिकांची उपसूचना मूळ त्रिराज्य योजनेला सुचवली. याला कृपलानी, अशोक मेहता, सी. डी. देशमुख आदी नेत्यांनी पाठिंबा दिला आणि महाद्विभाषिकांची योजना (सीमा प्रश्न बाजूला ठेवून) ३४१ विरूद्ध ४० अशा मताधिक्याने ९ ऑगस्ट रोजी पारीत झाली. या महाद्विभाषिकांविरूद्ध गुजरातेत निदर्शने झाली. अहमदाबादेत तर त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. विद्यार्थी रस्त्यावर आले आणि निदर्शकांवर जो गोळीबार झाला त्यात १५ व्यक्ती ठार झाल्या. आता गुजराती मंडळी म्हणू लागली की आम्हाला महागुजरात हवा आहे आणि मराठी मंडळी म्हणत होती की आम्हाला महाराष्ट्र हवा आहे. दोन्ही प्रांतात द्विभाषिकांविरूद्ध आंदोलन सुरू झाले.

**संसदीय लढा :** १ नोव्हेंबर १९५६ रोजी महाद्विभाषिक अस्तित्वात आले. अर्थातच यशवंतराव चव्हाण त्याचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर ताबडतोब मार्च, १९५७ मध्ये ॲसेंब्लीची निवडणूक झाली. समितीमध्ये सर्व विरोधी पक्ष एकत्र होते. त्यामुळे प्रत्येक पक्षाला जेवढ्या जागा मिळतील तेवढ्या हव्या होत्या. संयुक्त महाराष्ट्र निर्मिती हे ध्येय महत्वाचे असल्याने संयुक्त महाराष्ट्र समितीची एकता कायम राखण्यासाठी एस. एम.नी स्वतःच्या पक्षाच्या हमखास निवडून येणाऱ्या जागा सोडून दुसऱ्या पक्षाला दिल्या. एस. एम. जोशी ज्या मतदार संघातून निवडून येत असत तो मतदार संघ हिंदू महासभेला पाहिजे होते. ते अडून बसले. तेव्हा एस. एम. म्हणाले ठीक आहे. पुण्यात शुक्रवार पेठेतून काँग्रेसचे सणस उभे राहणार होते. त्यांच्याविरूद्ध कोणीच उभे राहायला तयार नव्हते. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील एक महत्वाचा भाग म्हणून एस. एम. सणसविरुद्ध उभे राहिले आणि निवडून आले. यशवंतरावांखेरीज त्यांचे सर्व रथी–महारथी निवडणूक हरले. मात्र विदर्भ, मराठवाडा आणि गुजरात या प्रदेशांनी काँग्रेसला हात दिला. नव्या द्विभाषिक असेंब्लीमध्ये काँग्रेसचे २३५ तर विरोधक १६१ निवडून आले. मुख्यमंत्री यशवंतराव झाले. त्यानंतर मुंबई नगरपालिकेची निवडणूक आली. ती निवडणूक समितीने लढवली. त्यात समितीला ९७ जागा तर काँग्रेसला ७१ जागा मिळाल्या. मुंबईने आम्ही महाराष्ट्रातच राहू इच्छितो असा कौल दिला.

**प्रतापचा सत्याग्रह :** प्रतापगडावर छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण पं. नेहरूंच्या हस्ते ३० नोव्हेंबर १९५७ रोजी व्हावे असा घाट यशवंतरावांनी घातला. त्याविरुद्ध शांततापूर्ण निदर्शने करावी असे एस. एम. जोशी यांनी समितीच्या बैठकीत सांगितले. तसे करण्याचे ठरले. वाई आणि पुढील सर्व घाटात ५०,००० निदर्शक जमले. एस. एम.नी पोलिसांची खात्री करुन दिली की, निदर्शने पूर्णतः शांततापूर्ण होतील आणि कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही. एस. एम.नी सांगितल्याप्रमाणे शांततापूर्ण निदर्शने झाली आणि महाराष्ट्राचे वातावरण द्विभाषिकाला पूरक नाही असे नेहरूंना यथावकाश कळून येऊ लागले.

# आ. विवेक पंडीतांकडून महिला दिनाचे बक्षिस (?)

**- प्रा. ट्रिजा परेरा**, आगाशी

काही दिवसापूर्व सांबोडी-आगाशी येथे गाव मिस्सासाठी तयारी केली होती. त्या अगोदर त्या टेबल-खुर्च्या माईकचा वापर करुन आमदार विवेक पंडीत ह्यांची संध्या ६.०० वाजता सभा लावली गेली. सभेमध्ये उपोषणापासून ते लाठीमारापर्यंतचा इतिहास सांगितला गेला. मात्र ह्या आंदोलनात चाळपेठ येथील १० ऑगस्ट २००९ च्या लाठीमाराचा कोठेही लवलेश नव्हता. ही घटना देखील तितकीच गंभीर होती. त्यामुळे ह्याविषयीची आठवण करुन देण्यासाठी मी पुढे गेले. सुरुवातीला स्त्रियांना महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन लाठी खाल्लेल्या सामर्थ्यशाली महिलांना सलाम देऊन फक्त विनंती करण्याच्या दृष्टीने मुद्याला हात घातला की मागच्या महानगरपालिकेच्या आंदोलनावेळी चाळपेठ नाक्यावर निरपराध लोकांना नुसत्या लाठ्याच नव्हे जबर मारहाण करुन त्यांना जबरदस्तीने अटक करुन त्यांच्यावर गंभीर गुन्हे नोंदविण्यात आले व पाच-सहा दिवस जेलमध्ये डांबण्यात आले. ह्याचाही संबंध ह्या घटनेबरोबर ठेवून त्यांच्यावरील गंभीर गुन्हे (कलमे) काढून टाकावित ही विनंती गृहमंत्र्याकडे करावी. इतके बोलते न बोलते तोच आ. विवेक पंडीत यांनी माझ्याकडून माईक घेतला व बोलण्यास सुरुवात केली. माझ्या भाषणाच्या रोखाने त्यांनी फैरी झाडण्यास सुरुवात केली. त्यात ते बोलले, 'आम्हांला काय करावे ते कोणी सुचवू नये. तुमच्यावर केसेसच झाल्यात ना? आमच्यासारख्या लाठ्या तर खाल्ल्या नाहीत ना? आमच्याप्रमाणे उपोषण करुन बघा. घरात बसणे सोपे असते रस्त्यावर उतरुन बघा. भाषणे करणे, लिहिणे सोपे असते प्रत्यक्ष आंदोलने करुन दाखवा. येशू ख्रिस्ताने नाही का फटके खाल्ले' वगैरे वगैरे बोलून ख्रिस्ती समुहांना पिघळविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या ह्या वक्तव्यांनी माझी खूप मानहानी केली गेली. त्यामुळे माझ्या कुटुंबियांना, नातेवाईक, मित्रमंडळी ह्यांच्याही भावना दुखावल्या. एक लोकप्रतिनिधी होण्यासाठी, इतरांनी तीन वर्षाआधीच सुरू केलेला महानगरपालिका विरोधीचा लढा आता महत्वाचा ठरला. आता स्थानिक नेत्यांना डावलून, त्यांच्या गावात शिरुन त्यांचा अपमान करणे, आपल्या ठरविलेल्या लोकांनाच प्रसिद्धीस आणणे अन् सत्तेचे राजकारण करणे हे आता त्यांना एवढ्यातच सहज शक्य झाले आहे.

समोर माईक असला तर बोलताना तारतम्य ठेवण्याचे भान आमदारांना भरसभेत नसेल व एखाद्या महिलेचा पाणउतारा करीत असेल तर लाठीमार त्याहून मोठा नाही. माझा आंदोलनात सहभाग आहे? कधीपासून आहे? ते विवेक पंडितांना काय माहित? कारण ते यापूर्वी मुळी कधी नव्हतेच!

१९८९ पासूनच्या आराखड्यापासून ते प्रत्येक सिडको आराखड्याविरोधात आणि वसईतील दहशतवादाविरूद्ध झालेल्या आंदोलनात मी लढत होते. जनता दल नेत्यांनी काढलेल्या २ ऑक्टोबर २००६ आणि २३ फेब्रुवारी २००८ च्या मोर्चात मी अग्रभागी होते. हजारो नागरिकांच्या हरकती नोंदविण्यासाठी मी गावोगावी फिरले. वसईभर लोकांबरोबर फिरून जनाजगरण केले. दरोडेखोरी-गुन्हेगारी या विरोधात वसईत निघालेल्या प्रत्येक मोर्चात मी लोकांबरोबर होते. ३ जुलै २००९ ला महानगरपालिका स्थापन होताच त्या विरोधात आम्हीच सुरुवातीला रान उठविले. लोकांची गर्दी व उद्रेक पाहून पंडीत उशीराने आंदोलनात उतरले कारण विधान सभेची निवडणूक समोर होती. महिला दिनी मला नावं ठेवण्याचा अधिकार पंडीतांना आहे का? याचे भान पाळलेले बरे. पारदर्शकता आणि चारित्र्य आम्ही साने गुरूजी, एसेम जोशी आणि नानासाहेब गोरे यांच्या आदर्शातूनच शिकलो आणि ती प्रत्यक्षात आचारतो सुद्धा! बरं का भाऊ!! ●

---

पान ४ वरून...

त्यांचे मत बदलू लागले. शेवटी सीमा प्रश्न तसाच लोंबकळत ठेवून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र द्यावा असे नेहरूंनी ठरवले आणि १ मे १९६० या दिवशी संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला. त्यात बेळगावकडील सीमाभाग, कारवार, डांग, निम्मा उंबरगाव तालुका महाराष्ट्राला गमवावा लागला.

एस. एम.च्या नेतृत्वामुळे एवढातरी महाराष्ट्र मराठी जनतेला मिळाला. या काळात सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची तारेवरची कसरत एस. एम.ना सतत करावी लागली. त्यांच्याबरोबर कॉ. डांगे, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, वालचंद कोठारी, माधवराव बागल, दाजीबा देसाई, बी. सी. कांबळे, दत्ता देशमुख, डॉ. नरवणे वगैरे नेते मंडळी होती. आचार्य अत्रे यांच्या 'मराठा'नेही भीम पराक्रम केला. शाहिरांनीही आपला वाटा उचलला. सेनापती बापट तर त्या सर्वांना आशीर्वाद देण्यासाठी सतत त्यांच्याबरोबर असत.

ढोबळ मानाने असे म्हणावे लागेल की, स्वातंत्र्य चळवळीत जी भूमिका नामदार गोखल्यांची होती ती यशवंतरावांची होती. टिळकांची भूमिका सामान्यपणे शंकरराव देव आणि हिरे वठवत होते तर गांधीजींची सत्याग्रहीची भूमिका एस. एम. जोशी यांनी वठवली म्हणूनच आचार्य अत्रे यांनी आपल्या खास शैलीत एस. (संयुक्त) एम. (महाराष्ट्र) असे समीकरण केले. खूपदा असे म्हटले जाते की, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या नेत्यांनी उद्याचा महाराष्ट्र कसा असेल व त्याची जडणघडण कशी असेल याचा कधी विचारच केला नाही. पण संयुक्त महाराष्ट्र समिती हा काही राजकीय पक्ष नव्हता. ती एक सर्वपक्षीय आघाडी होती. समितीचे ध्येय फक्त एकच होते व ते म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती. महाराष्ट्राची राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जडणघडण कशी असावी यासंबंधीचा विचार व त्यासाठी लागणारी कृती हे काम महाराष्ट्रातील राजकीय पक्षांचे विशेषतः राज्यकर्त्या पक्षाचे होते. ती जबाबदारी संयुक्त महाराष्ट्र समितीची मुळीच नव्हती.

**- विंग कमांडर अभय जोशी** (- साभार 'लोकसत्ता')

# पुरोगामी चळवळीपुढचे राजकीय आव्हान

**– प्रतिमा जोशी**

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशा निर्धाराने सतत दहाबारा वर्षे चिवट झुज दिल्यानंतर १ मे १९६० रोजी स्वतंत्र्य महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. या राज्याचा सुवर्णमहोत्सव आता उंबरठ्यापाशी येऊन ठेपलाय. महाराष्ट्र पन्नाशी गाठतो आहे.

मुंबईचे गिरणी कामगार, कष्टकरी आणि सर्वसामान्य चाकरमान्यांनी साथी एस. एम. जोशी, कॉ. श्रीपाद अमृत डांगे आणि आचार्य अत्रे यासारखे बिनीचे नेतृत्व स्विकारून आणि १०६ हुतात्म्यांनी आपले रक्त सांडून हे राज्य मिळविले असले, तरी प्रत्यक्षात त्याचा मंगलकलश आणण्याचा मान काँग्रेसच्या यशवंतराव चव्हाणांनी मिळवला. स्वतंत्र राज्याला सातत्याने विरोध करणारे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांनी ज्या विराट सभेला संबोधले त्या सभेचे साधे बोटभर आमंत्रणही संयुक्त महाराष्ट्रासाठी जीवाचे रान करणाऱ्या एसेम नि डांगेसारख्या लोकनेत्यांना नव्हते.

पुढच्या पन्नास वर्षात काँग्रेसने डाव्या पुरोगामी चळवळींबाबत हेच धोरण अवलंबलेले दिसते. प्रश्न उपस्थित करायचे चळवळीने, जनमत संघटित करायचे चळवळीने, सामान्यांच्या लाभाचे निरनिराळे प्रयोग राबवायचे चळवळीने, विविध क्षेत्रांतील अद्ययावत ज्ञानाचा अभ्यास करायचा चळवळीने आणि या प्रश्नांवर आधारित धोरणे, प्रयोगांच्या पायावर परस्पर आखलेले कृती आराखडे, ज्ञानाच्या विश्लेषणातून आलेल्या नव्या संकल्पनांवर लीलया जमवलेला कॉपीराइट या सर्वांचे धनी व्हायचे काँग्रेस सरकारने! मेहनत तुम्हाला आणि श्रेय आम्हाला, गरज वाटलीच तर तुमचे सत्कार करु, नाइलाज झालाच तर तुमच्यासोबतही तात्पुरते राहू अशा युक्तीने सरकार चालवताना रा. स्व. संघ आणि त्यांच्या परिवारातील संघटनांच्या धर्मांध राजकारणाला आपणच थोपवू शकतो अशीही प्रतिमा काँग्रेसने या पन्नास वर्षात उभी केली.

कपटी मित्रापेक्षा दिलदार शत्रू बरा असे म्हणतात. इथे तर पुरोगाम्यांचा शत्रूही कपटी आणि कथित मित्रही कारस्थानी अशी स्थिती. या चक्रव्यूहात शिरलेल्या पुरोगाम्यांचा अभिमन्यूप्रमाणेच बाहेर पडण्याचा रस्ता हरवून गेला. समाजवादी समाजरचनेत स्वप्ने पाहणाऱ्या चळवळींची चहूबाजूंनी कोंडी केली गेली. एकाच वेळी कधी विकासाच्या तर कधी धर्मांधतेच्या, कधी श्रीमंतधार्जिण्या धोरणांच्या तर कधी पद्धतशीर जोपासल्या जाणाऱ्या जातीयतेच्या विरोधात उभ्या राहू पाहणाऱ्या पुरोगाम्यांचे मोर्चे दहा आघाड्यांवर वळवून एकेका प्रश्नात एकेक गट कसा अडकून पडेल याच्या खेळी खेळल्या जात होत्या तेव्हा जनसंघाबरोबर म्होतूर लावून त्यावेळचा समाजवादी पक्ष राजकारण करु पाहत होता आणि काँग्रेसच्या इंदिरा गांधीचा पदर पकडून कम्युनिस्ट पक्ष विश्वासार्हता गमावू लागला होता.

हे भ्रमाचे भोपळे फुटले तेव्हा हाती फारसे काही उरले नव्हते. लोकसभा, विधानसभा जाऊच दे, पण साध्या नगरपालिका आणि ग्रामपंचायतीही हातातून सुटल्या होत्या आणि संसदबाह्य समाजपरिवर्तनाची चळवळ विकलांग झाली होती. लोकशाही व्यवस्थेत लोकांच्या आंदोलनातून व्यक्त होणाऱ्या आशा-आकांक्षांचे रुपांतर प्रत्यक्ष कार्यक्रमात किंवा धोरणात करण्यासाठी राजकीय प्रतिनिधित्वाची मोठी गरज असते. राजकीय आधारच संपल्याने चळवळी उभ्या राहतात पण त्यातून अपेक्षित कोणताही परिणाम साधला जात नाही. अंतिमत: लोकांमध्ये अशा संघटनांचे वजन हलके होत जाते.

आज आसपास पाहिले तर हेच चित्र दिसते. गिरणी कामगारांचा लढा असो की शेतमजुरांचा, पांढरपेशा नोकरदारांच्या संघटना असोत की असंघटित कष्टकऱ्यांच्या, झोपडपट्ट्यांतील गरीब असोत की शिक्षणाचे प्रमाण वाढूनही अत्याचार सोसावे लागणाऱ्या महिला, परमाणु नि:शस्त्रीकरण असो की अंधश्रद्धा निर्मूलन... कोणत्याही आघाडीवर राजसत्ता आणि समाज व्यवस्थेवर कसल्याही प्रकारचा दबाव निर्माण करण्याची पुरोगामी चळवळीची ताकद खच्ची झालेली दिसते. त्यातही जे काही बदल होतात त्यामागे काळाचा आणि लोकांच्या तातपुरत्या फायद्याचा रेटा किती आणि चळवळीची ताकद किती याचा आढावा घ्यायला गेलो तर उत्तर अनुकूल येण्याची शक्यता फारच कमी.

या पार्श्वभूमीवर पुरोगामी चळवळीतील असंख्यांना आपल्या विचारांचे पक्ष नेस्तनाबूत झाल्याने आता आपणच राजकीय पक्ष स्थापन केला पाहिजे, निवडणूका लढवल्या पाहिजेत असे वाटू लागते. मग बैठका होतात. समाजवादी नि कम्युनिस्ट पक्षांच्या भूतकाळातल्या बालेकिल्ल्यांची यादी बनवली जाते. असे निवडक मतदारसंघ कागदावर मोजून समाजात बऱ्यापैकी नाव आणि काम असलेल्या व्यक्तींना उभेही केले जाते. जाहीरनामे होतात, तीसपस्तीस वेगवेगळे गट पाठिंबा देतात, मोबदल्याची अपेक्षा न करता कार्यकर्ते प्रचारमोहिम राबवतात. काही गट प्रत्यक्ष निवडणूकीत उतरत नाहीत, पण आपापल्या कार्यक्षेत्रांचे, उदाहरणार्थ पंचायतराज, युवकवर्ग, महिला, दलित, अल्पसंख्य इत्यादी सखोल जाहीरनामे तयार करतात. मिडीयाला सतत काहीतरी लागते त्यामुळे त्यांना प्रसिद्धीही मिळते. मुख्य धारेतले पक्ष आणित्यांचे उमेदवार यांना त्याचे काही सोयरसूतक नसते. यथावकाश चळवळीचे उमेदवार पडतात. बहुतेकांचे डिपॉझिटही वाचलेले नसते. नवे सरकार येते. चळवळींनी मांडलेले प्रश्नच खरे तर या राजकारणाचा मुख्य आधार असतात जातपात, धर्म, पैसा हाच विजयी उमेदवाराचा पाया असतो आणि चळवळी ज्यांना लोकविरोधी विकास म्हणतात त्याच विकासाचा आराखडा त्यांच्या पक्षाने राबवलेला असतो आणि लोकांनीही त्यांना मते दिलेली असतात.

पुरोगाम्यांचे निवडणुकीला उभे राहिलेले आणि न राहिलेलेही गट पुन्हा आपापल्या कामांना लागतात. मधल्या काळात या गटातले काही चलाख लोक मुख्य धारेतल्या पक्षांत गेलेले असतात तर दुसरीकडे बहुसंख्य चळवळवाले हे अधिकाधिक कडवे आणि दुराग्रही होत जातात. या कडवेपणापासून चळवळ आणखी एकाकी पडत जाते आणि तरीही पुन्हा निवडणुका जाहीर झाल्या की हेच चक्र फिरायला सुरूवात होते.

हे सर्व पाहता लोक, राजकारण आणि चळवळी या तीन शब्दांमागील इतिहास, वर्तमान आणि त्यांचे भविष्य समजून घ्यायला हवे.

मात्र त्याआधी चळवळीतील आणखी एका तगड्या प्रवाहाची दखल घेणे क्रमप्राप्त आहे. तो आहे रिपब्लिकन आणि आंबेडकरी चळवळींचा प्रवाह. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक वारसा लाभलेला रिपब्लिकन पक्ष त्यांच्या मृत्यूनंतर तुकड्यात तर विखुरलाच, पण निव्वळ नवबौद्धांचा

पक्ष अशा प्रतिमेत जेरबंद होत काँग्रेसच्या हातातले खेळणे बनला. त्याला छेद देत उभी राहिलेले दलित पँथरची चळवळही हळूहळू त्याच मार्गाने गेली. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे भूमीमुक्ती आंदोलन वगळले तर अस्मिता आणि भावनिक प्रश्नांमध्येच गुरफटलेले हे गट जगण्यामरण्याच्या, धोरण नियमांच्या प्रश्नांना कधी ताकदीने भिडले नाहीत. विविध दलित जाती, जमाती आणि सुधारणावादी उच्च व मध्यम जाती यांचा प्रातिनिधिक पक्ष निर्माण करण्याच्या दृष्टीने व्हायला हवेत तसे आणि तितके प्रयत्न झाले नाहीत.

चळवळींची विसंगती इथूनच सुरू होते. दलित चळवळीने जात (त्यातही पूर्वाश्रमीचे महार) प्रश्नापलिकडे भौतिक प्रश्न दुय्यम ठेवले, तर गेल्या २०-२५ वर्षात नव्या आर्थिक धोरणांतून नि पारंपारिक सरंजामी सत्ताकारणातून निर्माण झालेल्या आव्हांनाविरोधात उभे ठाकताना समाजवादी आणि कम्युनिस्टांच्या अजेंड्यावरचा जाती अंताचा मुद्दा खाली ढकलला गेला. अगदी डॉ. लोहियांना मानणाऱ्या समाजवादी गटांनीही मंडलच्या पत्त्याची खेळी केल्यानंतर पुढे मात्र निव्वळ आघाड्यांचे राजकारण केले. सत्ता हे समाज परिवर्तनाचे साधन आहे असे मानणाऱ्या या गटांनी महाराष्ट्रात तरी मंडळ कार्डाचे हे साधन तसे भान ठेवून वापरलेले मात्र दिसत नाही. उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये मंडल कार्ड वापरले गेले. त्यात परिवर्तन किती आणि सत्तासोयरिकी किती हा एक वेगळाच विषय आहे. (आणि तिथल्या समाजवादी राजकारणाचे पुढे काय झाले आहे हाही!)

उलट मंडलला शह म्हणून कमंडलचे राजकारण करणाऱ्या संघपरिवारातील भाजपने मंडलोत्तर मध्यम जातींमधील जागृतीचा उपयोग केला आणि मंडल नि कमंडल दोन्हींचा फायदा करुन घेतला. केंद्रात सत्ता मिळविणे या पक्षाला अवघड असले तरी अर्धा डझन राज्यांत सत्ताधारी आणि अन्य ठिकाणी लक्षणीय विरोधी पक्ष इतकी कमाई भाजपने नक्कीच केली आहे. गरज पडेल तेव्हा धार्मिक नि जातीय आवाहन आणि एरवी बिजली, पाणी, सडक यासारखे विकासाचे प्रश्न असा बॅलन्स त्यांनी सांभाळलेला दिसतो. या चलाख धोरणांमुळे काँग्रेस आणि भाजप यांच्या आयडेंटिटीमधल्या सीमारेषा बऱ्याचदा पुसट होताना दिसतात, आणि दोघांचे मिळून एकत्रित असे जीवावरच उठलेले आव्हान पुरोगाम्यांसमोर उभे ठाकते. महाराष्ट्रात समाजवादी आणि आंबेडकरी चळवळीतील मोठा हिस्सा व्यापक राजकारणाच्या नावाखाली निर्णायक क्षणी काँग्रेसबरोबर राहताना दिसतो. ज्यांनी आव्हान उभे केले त्यांच्याबरोबरच पंगतीला बसावे लागत असल्याने वर्गजाती अंताबाबत हा हिस्सा मूग गिळून बसतो. अशी मुस्कटदाबी झाल्याने समाजवादी तर राजकारणाच्या मुख्य धारेतून बाहेर फेकलेच गेले. त्यांचा सध्याचा अपभ्रंश, जनता दल (सेक्युलर) या पक्षाला विधानसभेत एक टक्कासुद्धा मते मिळाली नाहीत. रिपब्लिकनांचीही फरफट झाली. कम्युनिस्टांमधील एक मोठा गट तुलनेने गेली तीनचार दशके काँग्रेसपासून अंतर ठेवून राहिलेला दिसतो. पण महाराष्ट्रात तरी मोजकी पॉकेट्स वगळता त्यांचा प्रभाव नाही. परिणामी रिडालोसचा प्रयोग अजिबात प्रभावी ठरला नाही. महाराष्ट्रात रिडालोसमधील सर्व पक्षांची एकत्रित मतेही दोन टक्क्यांच्या वर जात नाहीत. विरोधी पक्ष म्हणून उभे राहण्यासाठी किमान १६ ते २० टक्क्यांच्या आसपास मते मिळावी लागतात. रिपब्लिकन, कम्युनिस्ट आणि समाजवादी असे तिन्ही प्रवाह एकत्र आले तरी मतांची संख्या आठ ते दहापट वाढविण्यासाठी त्यांना शंभरपट मेहनत तर घ्यावी लागेलच, पण आजचे वास्तव लक्षात घेऊन आपल्या धोरणांत आणि रणनीतीतही बदल करावे लागतील.

उजवीकडे झुकणारे मध्यममार्गी आणि मध्यममार्गाचा आभास निर्माण करणारे उजवे अशा आजच्या राजकीय विभागणीत डावे राजकारण रेटायचे तर सर्वप्रथम निखल मध्यममार्गी राजकारण प्रस्थापित करणे गरजेचे आहे. त्यानंतरच ते किंचित डावीकडे झुकवण्याचे प्रयत्न सुरू करता येतील. लोक जसे पूर्ण उजवीकडे झुकत नाहीत (आजवर तरी भारतीय जनतेने हा समंजसपणा दाखवला आहे) तसेच पूर्ण डावीकडेही झुकणार नाहीत याचेही भान आपण सर्वांनीच ठेवलेले बरे.

जगभरातले असे 'डावे' प्रयोग अंशत:च यशस्वी ठरले आहेत हेही विसरून चालणार नाही. तत्वज्ञानावर निष्ठा असणे वेगळे आणि तत्वज्ञान समाज व्यवहारात नि सत्ताकारणात अंमलात आणताना येणाऱ्या मर्यादांची जाणीव असणे वेगळे. अशी जाणीव असली की, निराशाही ग्रासत नाही आणि भलतेच भ्रमही डोक्यात साठत नाहीत.

उदाहरणार्थ मराठीचा मुद्दा घेऊ. गेल्या दोन तीन वर्षांपासून मराठी आणि राज ठाकरे असे जे समीकरण निर्माण झाले आहे (किंवा केले गेले आहे) त्या संदर्भात डाव्या पुरोगामी चळवळीचे प्रतिसाद कसे होते?

भारत हे एक सार्वभौम राष्ट्र आहे सर्व भारतीयांना राज्यघटनेने समान मुलभूत अधिकार बहाल केले आहेत. या अधिकारात संचार स्वातंत्र्य, जीवित स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांचाही समावेश होतो. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतर करणे, रोजगार शोधणे, स्थायिक होणे हा प्रत्येक भारतीयाचा वादातीत अधिकार आहे हे रेटून मांडणे गरजेचेच आहे पण त्याबरोबर भारतातील बहुभाषिकत्व, सांस्कृतिक वैविध्य, स्वतंत्र ऐतिहासिक वारसे, जगभरच आढळून येणारी प्रादेशिक अस्मिता याचेही व्यावहारिक भान ठेवणे गरजेचे आहे. किंबहुना या मुद्यांवरच भारतात भाषिक राज्यांची निर्मिती झाली.

इंग्रजी राजवटीच्या विरोधात उभा राहिलेला स्वातंत्र्य लढा हा हजारो वर्षाच्या इतिहासातील पहिला असा लढा होता की ज्यामध्ये भारताच्या दक्षिणोत्तर आणि पूर्वपश्चिम अशा सर्व भौगोलिक सीमांमध्ये सामावणारा प्रत्येक प्रांत सहभागी झाला होता. एरव्ही हजारो वर्षाचा वारसा असलेला हा देश अगदी शंभरएक वर्षापूर्वीपर्यंत राजकीयदृष्ट्या शतखंडित झाला होता. मोगल हे दिल्लीच्या तख्तावर बसून स्वत:ला हिंदुस्थानचे बादशहा म्हणवून घेत होते तेव्हा दक्षिणेत आणि ईशान्येकडे वेगळ्या राजवटी होत्या. मोगल मुलखातही वेगवेगळी साम्राज्ये होतीच. शेकडो हजारो वर्षाच्या या राजकीय परंपरेमुळे समाज जीवनातही वैविधे होती. अनेक ठिकाणी केवळ वैविध्यच नव्हे तर परस्पर विरोधही होता. भाषा तर दहा कोसागणिक बदलत होत्या. याचे अवशेष पूर्णपणे वितळून एकसंध राष्ट्र म्हणून उभे राहण्यासाठी किमान काही अवधी लागणारच. इतिहासाच्या भल्यामोठ्या अवकाशात ६२ वर्षे म्हणजे चिमूटभराचा कालावधी. जात, धर्म, भाषा, प्रांत याबाबत कमालीची भिन्नता आणि विषमताही असलेल्या देशात सामाजिक न्याय आणि सेक्युर्लॅरिझम रुजवणे ही प्रदीर्घ आणि जिकीरीची प्रक्रिया आहे. त्यात भरीस भर म्हणून राजकीय आणि आर्थिक धोरणांमुळे निर्माण झालेले प्रादेशिक असमतोल आहेतच.

या पार्श्वभूमीवर हा प्रश्न निव्वळ मुलभूत संचारस्वातंत्र्याचा आणि जीविताच्या हक्काचा नाही, तर त्यात वर उल्लेख केलेले अन्य मुद्देही

मिसळलेले आहेत याचे भान सुटून चालणार नाही. आजची मुंबईची अवस्था बैलाकडे पाहून पोट फुगवणाऱ्या बेडकासारखी झाली आहे हे नाकारण्यात अर्थ नाही. पायाभूत सोयीसुविधा आणि लोकसंख्या यांचे कमालीचे व्यस्त परिणाम येथे आहे आणि या वाढत्या शहरी लोकसंख्येसाठी ग्रामीण भागातील साधनसंपत्ती ओरबाडून घेतली जाते आहे.

उदारीकरणानंतर इथली उत्पादन व्यवस्था मोडीत निघाली आणि सेवाक्षेत्राने पाय पसरले. मोडीत निघालेल्या व्यवस्थेवर (उदा. गिरण्या, ठाणे-बेलापूर पट्ट्यातील कारखाने) ज्यांचे पोट अवलंबून होते अशी माणसे बहुसंख्येने मराठी होती. जे क्षेत्र नव्याने आले त्यात अन्य भाषिकांची टक्केवारी लक्षणीय प्रमाणात वाढली. उदारीकरणाला कामगार कायदे, नीतीनियम यांचे वावडेच होते. त्यांनी इथली कामगार चळवळ, या चळवळीने प्रस्थापित केलेले कामगारांचे किमान वेतन, कामाच्या तासांचे असे सर्व हक्क अशरक्षः मुरगाळून टाकले. स्वस्तात स्वस्त श्रम, अधिकाधिक उत्पादन, सामाजिक सुरक्षेची गळचेपी करणाऱ्या या नव्या व्यवस्थेने कंत्राटी कामगार अत्यल्प वेतनावर घ्यायला सुरूवात केली. याच कालावधीत मुंबई आणि आसपास तसेच महाराष्ट्रातील अन्य मोठ्या शहरात हिंदी पट्ट्यातील भुकेकंगाल माणसे मिळेल त्या पैशांवर काम करायला दाखल होऊ लागली. हिंदी पट्ट्यात पोटाला काहीच मिळत नव्हते, इथे दिवसाला वीस तर वीस रुपये...पैसे तर मिळतात असा त्यांचा साधा हिशेब होता. बघता बघता मुंबईसह महाराष्ट्रातली श्रमशक्ती मोठ्या टक्केवारीने हिंदीभाषी झाली. कॉर्पोरेट क्षेत्रापासून अंगमेहनती कामापर्यंत हा बदल घडलेला दिसेल. या सर्वात मराठी भाषिकांची संख्या कमी झाली नसली तरी टक्केवारी घसरली ही वस्तुस्थितीच आहे. एका बाजूने इंग्रजीचा, दुसऱ्या बाजूने हिंदीची तर तिसऱ्या बाजूने देशांतील सर्वच प्रांतातून येणाऱ्या अन्य भाषिकांची रेटा यामुळे मराठी भाषिक माणसे अस्वस्थ असणे, त्यांना असुरक्षिततेचा भयगंड वाटणे शक्य आहे. गेल्या वीसएक वर्षात मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडू लागल्या. रस्ते, दुकाने, रेल्वे कुठेही गेले तरी मराठी कानावर पडण्याचे प्रसंग कमी होऊ लागले. याच काळात मराठी साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठांवरूनही मराठी वाचवा असे ठराव होत होतेच.

हे सर्व इतक्या विस्ताराने सांगायचे कारण इतकेच की, मराठीच्या मुद्यामागे ही सारी कारण परंपरा येते याकडे दुर्लक्ष होऊ नये. दुसरे म्हणजे भाषिक मुद्दा हा प्रतिगामी आणि घटना विरोधीच असतो असेच गृहितच सदासर्वकाळ मांडता येत नाही. तसे नसते तर द्वैभाषिक राज्याला विरोध करत संयुक्त महाराष्ट्रासाठी आंदोलने उभारणारे एसएम, डांगे, अत्रे आणि डाव्या समाजवादी संघटनांमधील अगणित कार्यकर्ते हे प्रतिगामी होते असेच म्हणावे लागेल किंवा आजही बेळगाव, कारवारसाठी लढे उभारले जातात हे कसे काय? हे प्रांत कर्नाटकात असले तरी भारतातच आहेत ना? 'हे विश्वचि माझे घर', 'जय जगत' किंवा 'जगातल्या कामगारांनो एक व्हा' या तत्वज्ञानाच्या पाइकांनी गुजरात आणि महाराष्ट्र मिळून एकच राज्य असण्याला खरे तर व्यापक दृष्टिकोनातून विरोध करणे तसे पाहिले तर चुकीचे होते.

पण असे आपण म्हणत नाही. भाषिक राज्यांची निर्मिती हे पूर्ण विचारांती उचलले गेलेले एक समंजस पाऊल होते. आजही ही प्रक्रिया झारखंड, छत्तीसगड आणि उत्तरांचल राज्य निर्मितीच्या माध्यमातून आणि स्वतंत्र तेलंगण, गोरखालँड या मागण्यांतून चालूच आहे. त्यामुळेच राज ठाकरे यांनी उभ्या केलेल्या मतलबी आणि विघटनवादी आंदोलनांचा प्रतिवाद करताना पुरोगामी चळवळींनी केवळ राज्यघटनेने दिलेले अधिकार, भारतीयत्व याच मुद्यांचा आधार का घ्यावा? मुळ रहिवाशी आणि 'बाहेरून' आलेले यांच्यात जगभरच द्वंद्व असल्याचे दिसते. ते अगदी स्वाभाविक आहे. भारताचा आर्थिक विकास, राज्याराज्यामधील विकासाचा असमतोल आणि उदारीकरणातून निर्माण झालेले शाश्वतीचे आणि जगण्याचे प्रश्न या सर्व मुद्यांबाबत गेली २० वर्षे चळवळी उभे करणारे डावे पुरोगामी गट राज ठाकरेंच्या आव्हानाला इतके बाळबोध उत्तर कसे देऊ शकतात? या गटांनी अथक परिश्रमातून जागतिकीकरणाचा जो चेहरा जगापुढे उघड केला आहे तेच राज ठाकरे यांना थेट उत्तर आहे. मराठी माणसाचे राज हे एकमेव कैवारी नाहीत याचेही आश्वासन लोकांना समजेल, त्यांच्या लक्षात येईल अशा भाषेत द्यावे लागेल. अस्मितेच्या किंवा भावनांच्या प्रश्नांवर लोकांना तर्काची बाजू योग्य असली तरी कळत नाही. तर्काने बोलणारी माणसे त्यांना आपली विरोधक वाटतात. हेच सत्य देव, धर्म याबाबतही लागू आहे. उजवीकडे झुकणारे मध्यममार्गी आणि मध्यममार्गाचा आभार करणारे उजवे यांच्या तावडीतून राजकारण किमान निखळ मध्यममार्गावर आणायचे तर याकडे दुर्लक्ष करुन कसे चालेल? ते डावीकडे नेणे तर पार पुढची गोष्ट!

तिथे कोणी असाही मुद्दा उपस्थित करेल की, जगण्यामरण्याचे, महागाईचे, रोजगाराचे, विकासाच्या नावाखाली चाललेल्या विस्थापनांचे असे इतके महत्वाचे प्रश्न अजेंड्यावर असताना या मराठीच्या मुद्याला इतके महत्व द्यायचे काय कारण? शिवाय आज या मुद्यावर कोणी लाखालाखांनी मते खेचत असले, तरी भविष्यांत त्यांचे काय? त्यांची क्रेडिबिलीटी ती किती?

पण महत्व मराठीच्या मुद्याचे नाहीच मुळी. ते एक उदाहरण आहे. तीस वर्षापूर्वी हाच मुद्दा घेऊन महाराष्ट्राच्या राजकारणात उतरलेल्या एका पक्षाने इथल्या दोन पिढ्या हिंदुत्वाच्या विचारांनी नासवल्या आहेत हे विसरून चालणार नाही. महाराष्ट्रातील आणि देशातीलही राजकारणाचे ट्रेंड्स पाहिले तर याची संगती लागू शकेल. या वर्षभरात लोकसभा आणि महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका झाल्या. दोन्हीकडे तीच सरकारे पुन्हा आली. याचा अर्थ केंद्र आणि राज्य सरकार हे कार्यक्षम होते आणि लोकांची त्याबद्दल काहीच तक्रार नव्हती का? तर तसे दिसत नाही. शेतकरी आत्महत्या करताहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे लोक कोलमडून पडले आहेत. जागतिक मंदीच्या नावाखाली लाखो लोकांनी नोकऱ्या गमावल्या तरी आहेत किंवा त्यांचे पगार भसाभस कापले तरी गेले आहेत. असंघटित क्षेत्रातली असुरक्षितता वाढत चालली आहे. नक्षलवाद्यांच्या बिमोडाच्या नावाखाली आणि एसइझेडच्या लेबलांखाली राजकारणी नि कॉर्पोरेटवाल्यांच्या जमिनी बळकाव मोहिमा चालू आहेत. देशभर दहशतवादी कारवाया नि आत्मघातली हल्ले चालूच आहेत. बायकांवर बलात्कार होताहेत, हुंडाबळी पडताहेत. चोऱ्यामाऱ्या नि गुन्हेगारींचे प्रमाण वाढले आहे. कुपोषणबळी चालूच आहेत. दलित आणि आदिवासींवरील अत्याचारांचे प्रमाण वाढतच चालले आहे. महागाईने कहर केला आहे आणि सर्वसामान्यांना जगणे मुश्कील झाले आहे. आणि तरीही महाराष्ट्रातील मतदानात या कशाचेच प्रतिबिंब उमटलेले दिसत नाही.

या निवडणुकांत मुद्देच नव्हते असा प्रचार सत्ताधारी आणि प्रसार माध्यमांतील राजकीय विश्लेषकांनी केला होता. निवडणूक प्रचार असो की विधीमंडळाचे सभागृह असो, विरोधी पक्षही विरोधी पक्षासारखे वागले नाहीत, वागत नाहीत असेही दिसते. नोकरशाही, विधीमंडळाची अधिवेशने

यापायी कोट्यावधी रुपयांचा चुराडा होतो आणि तरीही लोकांचे साधेसाधे प्रश्न तसेच कायम राहतात... प्रश्न सुटले-न सुटले तरी लोक ठराविक पद्धतीनेच मतदान करतात..चुकूनमाकून सत्ताधारी नि विरोधकांचे चेहरे बदलले तरी बाकी काहीच बदलत नाही...प्रश्नही सुटत नाही आणि राजकीय रचनाही बदलत नाही...या साऱ्याचा अर्थ काय?

निवडणूक विषयक जाणकार सांगतात की, या वर्षीच्या निवडणुकांत पैसा पाण्यासारखा वाहवला गेला. पैसा हा घटक नवा नसला तरी यावेळी कहर झाला. पोत्यांनी पैसे वाटले गेले. उमेदवार खाजगीत सांगत की, मतदानाच्या दिवशी दुपारी ४ वाजेपर्यंत लोक फारसे बाहेरच पडत नव्हते, ते आमच्या कार्यकर्त्यांकडून पैशाची किंवा अन्य लाभांची वाट पाहत आणि ते हातात पडल्यावर मते देत होते. भलेभले राजकारणीही पैशाची ही गणिते जमवताना मेटाकुटीला आल्याचे निदान दाखवत तरी होते. राजकारण्यांनीच लोकांना लावलेली सवय त्यांच्या अंगलट येत होती की जन्माचे प्रश्न सुटणार नाहीत निदान आता जे मिळतेय ते तरी घ्यावे असे लोकांचे वागणे होते? की पैशाच्या जोडीला असलेली दंडेलशाही यामागे होती? ही दंडेलशाही केवळ मनगटी ताकदीचीच की, जातीपातीचीही होती? पाण्याच्या प्रश्नाने हैराण झालेल्या सांगलीत अफझलखान वधाच्या दृश्याने सेनाभाजप युतीच्या झोळीत दोन जागा टाकल्या आणि मावळात सेझविरोधी प्रभावी काम केलेल्या डाव्या पुरोगामी उमेदवाराचे डिपॉझिटही वाचवणे कठीण झाले याची संगती कशी लावणार? विदर्भातील शेतकऱ्यांसाठी दिलेल्या पॅकेजमध्ये भ्रष्टाचार झाला, त्यात घोटाळे झाले, त्यात अनेक त्रुटी होत्या असे आरोप झाले तरीही शेतकऱ्यांच्या पदरात थोडेफार तरी पडले म्हणूनच त्यांनी आम्हांला निवडून दिले असे राजकारणी सांगतात तेव्हा नेमकी कशी प्रतिक्रिया द्यायची? जयभीमपेक्षा रामराम बरा म्हणत मागात जातींमध्ये आपसात झुंज लावली गेली, मराठी आणि हिंदी मतांचे पोलरायझेशन केले गेले, जागा वाटपातील गणितात पैसा अधिक जात हाच फॅक्टर प्रभावी राहिला, महिलांच्या वाट्याला तीन टक्केही उमेदवारी आली नाही...राजकारण हे पाण्यावर अलगपणे तरंगणाऱ्या तेलाच्या थेंबासारखे कशाशी काहीही देणेघेणे नसल्यागत रुजले आहे. त्याचे राजकारण्यांना काही सोयरसुतक नसले तरी लोकांनाही काही त्यात गैर वाटत नाही असाच कडू निष्कर्ष यातून काढावा काय? की आंदोलने करणारी माणसे सज्जन असतात, त्यांच्याबरोबर राहून प्रश्न सोडवून घ्यावेत पण ही माणसे राज्यकारभार करु शकत नाहीत, सबब यांना निवडून देऊ नये असे लोकांना वाटत असते?

कोणताही राजकीय पक्ष दोन गोष्टींच्या पायावर उभा राहतो. ध्येयधोरणे आणि संघटना. त्यातील संघटना फारच महत्वाची. काँग्रेससारख्या बेशिस्त आणि मेळावा भरल्या सारख्या पक्षाचीही तालुका, ब्लॉक कमिटी पातळीवर संघटना असते. ब्लॉक किंवा वॉर्ड, तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर एक यंत्रणा सुसुत्रतेचे काम करते. राष्ट्रवादी काँग्रेसही याच पद्धतीची कार्बन कॉपी आहे. शिवसेना (आणि मनसेही) शाखा पातळीपासून सुरू होते. किंबहुना शाखा हेच या पक्षाचे बलस्थान आहे. भाजप तर संघटनाबांधणी आणि शिस्तीबद्दल प्रसिद्धच आहे. हे बव्हंश पक्ष देश आणि राज्य पातळीवर चेहरा असलेले नेतृत्व, उपक्रमशीलता, सहकारी बँका, कारखाने, शेती व शेती आधारीत उद्योग यांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचतात. मघा आपण पाहिल्याप्रमाणे गरजेनुसार कधी उजवीकडे झुकणारे मध्यममार्गी तर कधीकधी सरळसरळ उजवेच राजकारण करतात आणि पुष्कळदा परस्परांना फायद्याची ठरणारी मिलीजुली नीतीही सत्ताधारी आणि विरोधक बेशक अवलंबतात. ही मिलीजुली लढाई इतकी बेमालूम असते की पक्षापक्षांमधल्या सीमारेषा कधी पुसरट होतात ते कळतही नाही. कालपर्यंत भगव्या पक्षात असलेला आज तिरंगा खांद्यावर घेतो, आज हाताबाहेर असलेला उद्या घड्याळाबरोबर जातो आणि हे दोघेही निवडून येतात. अगदी लोकशाही यंत्रणेचा वापर करुन निवडून येतात आणि निवडून आल्यानंतर हे दोघेही विकासकामांमधले आपापले वाटे काढून घेतात. हे आजचे वास्तव आहे.

या पार्श्वभूमीवर डाव्या पुरोगाम्यांपाशी काय योजना आहेत? पुढील दहा वर्षाचे पद्धतशीर नियोजन करुन ब्लॉक नि तालुका पातळीपासून राजकीय संघटना बांधण्याची कोणती योजना आहे? संस्थात्मक जाळे उभारण्याबाबत हे गट कितपत गंभीर आहेत? भौतिक प्रश्नांवर सारा भर असणारी ही मंडळी जातधर्मभाषा या चक्रव्यूहाचा भेद करण्यासाठी नव्याने काही नीती आखताहेत का? लाँग टर्म उद्दिष्ट गाठण्यासाठी राजकारणात कधीमधी तात्पुरते समझोते आणि हातमिळवणी करावी लागते हे पचायला कठीण असले तरी त्याचा अपरिहार्यता त्यांना मान्य आहे का? समझोते म्हणजे तडजोड नाही हे लक्षात येते का?

या प्रश्नांची उत्तरे होकारार्थी असतीलही कदाचित, पण त्यांचे बळ फारच थोडके असण्याची शक्यताच जास्त. जात, पैसा, धर्म, भाषा या आधारावर भांडवली राजकारण केले जाऊ नये असे मानणाऱ्यांना या चौकटीत सध्या तरी पक्ष म्हणून फार थोडी जागा आहे. आपल्या ध्येयधोरणातले राजकारण प्रत्यक्षात यायचे तर त्यासाठी समाजात तशा प्रकाशची जागृती होणे गरजेचे. राजकारणाची आजची चौकट बदलायची असेल तर ती दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. जी माणसे विकत घेतली जाऊ शकत नाहीत, जे आपल्या म्हणण्यावर कोणत्याही परिस्थितीत ठाम असतात अशा लोकांसाठी लोकशाहीत एक महत्वाची भूमिका असते. दबाव गटाची. अहिताचे वाटणारे निर्णय बदलायला लावणे, बदलता आले नाहीत तर त्याची तीव्रता कमी करणे, राजकीय चलाखी समोर आणून समाजात जातीय सलोखा निर्माण करणे, उपेक्षित आणि वंचित घटकांचे प्रश्न उचलून धरणे हे सध्या तरी केवळ दबाव गटांच्यांच अजेंड्यावर असू शकते. पर्यायी राजकारण म्हणजे प्रस्थापिक पक्षांच्या गर्दीत नवा पक्ष निर्माण करणे ही समज आजच्या स्थितीत फारच भाबडेपणाची ठरू शकते. अशा स्थितीत पर्यायी राजकारण म्हणजे सध्याच्या राजकारणाच्या चौकटीला जमतील तितके छेद द्यायचा प्रयत्न करणे.

त्यासाठी समाजवादी, कम्युनिस्ट आणि आंबेडकरी प्रवाहांना सनातनी चौकटीतून बाहेर पडून एकमेकांबरोबर राहण्याशिवाय पर्याय नाही. भौतिक आणि भावनिक अशा दोन्ही प्रश्नांची सांगड घातल्याशिवाय तर जमणारच नाही. प्राणपणाने विरोध करुनही उदारीकरण आले. ते येऊन वीस वर्षे व्हायला आली. म्हणजेच एक पिढी उलटली. या १९९० साली आणि त्या आसपास जन्मलेल्या पिढीचे प्रश्न, त्यांचे वास्तव यांचाही आढावा घ्यायला हवा. कामाच्या पद्धती, संवादाचे तंत्र या साऱ्यात बदल करावा लागेल. त्यासाठी आपल्या स्वत:च्या व्यक्तिमत्वातही बदल करावे लागतील. अप्रिय प्रिय वाटेल अशा भाषेत मांडण्याची कला अवगत करावी लागेल आणि तरीही लढाई सोपी नाही. या तिन्ही प्रवाहांच्या पूर्वसूरींचे कर्तृत्व जितके मोठे तितक्याच त्यांच्या मर्यादाही! त्यातून बाहेर पडणे कठीण आहे, पण पडावे तर लागेलच. (साभार आंदोलन) •

*With Best Compliments From :*

Su-Kam
HOME UPS SYSTEMS
The Latest Technology, The Largest Range

CE CERTIFIED

**The Latest Technology, The Largest Range**
**Global Certifications**

**Authorised Dealer**

## JENN BATTERY SALES & SERVICE

**Shop No. 5, Parikh Commercial Centre, Agashi Road,**
**Bolinj, Virar (West)**
**Shop No. 5, Taneya Stephan REsidency, Nallasopara (w).**

### Pure Sine Wave Home UPS Systems

World's most advanced sine wave technology based, this Home UPS systems provides 100% pure power which runs all appliances without the irritating-humming sound.

### Feature Highlights

- Fuzzy Logic Control : Advanced technology which protects battery, reduces frequency of water topping and enhances battery life.
- Saves 40% electricity bill as compared to square wave inverter.
- Incorporates smart overload sensing and short-circuit protection with auto reset.
- Ideal for sophisticated electronic equipment like new generation DVD players, monitors, printer, scanner, in addition to tube lights, fans and room coolers.
- Negligible switchover time : for the computer to run uninterrupted during power cuts, without rebooting.
- Space Saver - ideal for modern day households.
- Choice of various aesthetically designed models.
- Option of castor wheel mounted trolley for easy movement.
- Suitable for Personal Computers, Printers, Fax machines, Fans, Tube lights and Television.

# वसई विरार महानगरपालिकाविरोधी हजारो सूचना दाखल

**वसई :** वसई विरार महानगरपालिकाविरोधात निर्भय जन मंच आणि जनता दलातर्फे कायदेशीर मुद्यांवर हरकत घेऊन दि. ३ जुलै २००९ ची अधिसूचना रद्द करण्याची व आधी गावे वगळून मगच निवडणूका घेण्याची सूचना करण्यात आली आहे. हजारो नागरिकांच्या वैयक्तिक सूचनासुद्धा दाखल करण्यात आलेल्या आहेत. वसईभरांतून हजारो नागरिकांनी या मोहिमेस चांगला प्रतिसाद दिला.

भारतीय राजघटनेचे अनुच्छेद २४३ (थ) प्रमाणे लहान क्षेत्राचे मोठे क्षेत्र करण्याआधी लोकवस्तीची घनता, लोकसंख्या वाढीचा दर, अकृषक क्षेत्र, भौगोलिक रचना आणि ७३ व्या घटनादुरूस्तीप्रमाणे ग्रामसभांचे ठराव या बाबींचा विचार करणे बंधनकारक आहे असे या सूचनात म्हटले आहे.

विरार-नालासोपारा-नवघर माणिकपूर या नागरीकरण झालेल्या शहरी क्षेत्राचा लोकसंख्या वाढीचा दर, लोकवस्तीची घनता प्रचंड मोठ्या प्रमाणात आहे तर ग्रामीण क्षेत्रात वस्ती विरळ असल्याने घनता व लोकसंख्या वाढीचा दर अतिअल्प असल्याचे दाखवून दिले आहे.

२००१ च्या जनगणनेप्रमाणे नागरीकरण झालेल्या ४१ चौ.कि.मी. क्षेत्राची लोकवस्तीची घनता प्रति हेक्टर १२४ व्यक्ती इतकी होती. यापैकी १५५० हेक्टर क्षेत्राची घनता तर ३४३ व्यक्ती प्रति हेक्टर होती. मात्र १५० वर्षे जुन्या वसई शहराच्या लोकवस्तीची घनता केवळ २४ व्यक्ती प्रति हेक्टर इतकी कमी होती. याकडे शासनाचे लक्ष वेधले आहे.

याउलट ३३९ चौ.कि.मी. ग्रामीण भागातील २००१ च्या जनगणनेप्रमाणे लोकवस्तीची घनता सरासरी ५ ते १० व्यक्ती प्रति हेक्टर इतकी कमी होती. २६ गावाची ५ व्यक्ती प्रति हेक्टर, १६ गावाची ५ ते १० व्यक्ती प्रति हेक्टर, १० गावाची १० ते २० व्यक्ती प्रति हेक्टर इतकी कमी होती. त्यात आता मोठी वाढ झालेली नाही.

कुटुंबनियोजनामुळे दोन किंवा एकच मूल ही संकल्पना राबविली जात असल्याने ग्रामीण भागात मूळ रहिवाशांची लोकसंख्या वाढ खूपच कमी होत असल्याने २०११ साली वाढीचे प्रमाण कमी राहील. २००१ साली लोकसंख्या वाढीचा दर ग्रामीण क्षेत्रांतील विविध भागात ११ टक्के, ८ टक्के, ५ टक्के अशा प्रकारे कमी होता. बाहेरील लोक आले नाहीत तर वाढीचे प्रमाण भविष्यात घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे या ग्रामीण भागाचे जतन केल्यास हा भाग आज आहे तसाच निसर्गसंपन्न राखता येणे शक्य आहे. असे महत्वपूर्ण निरिक्षण या सूचनात नोंदविले आहे.

शहरी भागात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाल्याने मोठ्या प्रमाणात जमिनी अकृषक झाल्या आहेत. ग्रामीण भागातील अकृषक जमिनीचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यातही एमएमआर अहवाल १९७०-९१ मधील नियम ५:२:६२ चे उल्लंघन करुन महसूल विभागाने हरितपट्ट्यात बिल्डरांना बिनशेती परवानग्या दिल्याने जमिनी अकृषक झाल्या आहेत. मात्र मूळ भूमिपुत्रांच्या अकृषक जागा खूपच कमी आहेत. म्हणून या भागात नव्या नागरिकरणासाठी बिल्डरांना परवानग्या देऊ नयेत असेही म्हटले आहे.

मुंबई शहराभोवती नवी मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, मिरा-भाईंदर अशी मोठी महानगरे उभी राहिली यात त्या भागातील निसर्गसंपदा गायब झाली. वसई तालुक्याचा ग्रामीण भाग शेती बागायतीमुळे हिरव्या निसर्गसंपदेने संपन्न आहे. म्हणून तेथील पर्यावरण मोडीत निघू नये. हा ग्रामीण भाग सर्वोत्तम सामाजिक सौहार्दाचा आदर्श आहे. तो गुन्हेगारी, प्रांतवाद, धर्मवाद यामुळे बाधीत होऊ नये, मूळ भूमिपुत्रांना आपल्या परंपरा व वारसा जपता यावा म्हणून ७३ व्या घटना दुरूस्ती प्रमाणे ग्रामसभांनी महानगरपालिकेत जाण्यास विरोध केला आहे. त्यांच्या घटनादत्त अधिकाराचा शासनाने मान राखावा व ज्या ग्रामसभांनी महानगरपालिकेत जाण्याविरोधी ठराव केले आहेत ती सर्व ४९ गावे महानगरपालिकेतून वगळावीत अशी सूचना करण्यात आली आहे.

अशा प्रकारे कायदेशीर मुद्दे उपस्थित करुन ३ जुलै २००९ रोजी शासनाने काढलेली अधिसूचना रद्द करावी व पुन्हा नव्याने अधिसूचना काढून विरार-नालासोपारा, नवघर-माणिकपूर या शहरापुरताच महानगरपालिका स्थापन करावी अशी सूचना करण्यात आली आहे. या सूचनांचे संकलन करुन त्या जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करण्यासाठी जॉन परेरा, पायस मच्याडो, रॉबर्ट डिमोन्ते, नितीन रॉड्रीग्ज, कॅरल क्रास्टो आदिंनी खूप मेहनत घेतली.

---

## प्रतिमा जोशी वरूणराज भिडे, कोठावळे पुरस्काराने सन्मानित

**मुंबई :** 'महाराष्ट्र टाइम्स'च्या जेष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी यांना मराठी पत्रकारितेमधील महत्वपूर्ण योगदानासाठी देण्यात येणारा 'वरूणराज भिडे स्मृती पुरस्कार' देण्यात आला. 'जहन्नम' या त्यांच्या काव्यसंग्रहाला 'केशवराव कोठावळे पुरस्कार' जेष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी जेष्ठ लेखक अनिल अवचट, प्रा. मीना गोखले, मॅजेस्टिकचे अशोक कोठावळे आदी मान्यवर उपस्थित होते. श्रीमती प्रतिमा जोशी यांनी समाजातील वेदना वाचकांसमोर मांडणारे अनेक स्तंभ लिहिले. समाज कार्याच्या नावाखाली बाजारपेठीय मुल्यव्यवस्थेचे भलामण करणाऱ्या संस्थांचे अमाप पिक एकीकडे आले असताना शरीरविक्रय करणाऱ्या महिलांचे प्रश्न स्त्री मुक्तीच्या अजेंड्यावर घ्यावेत अशी मानसिकता आजही दिसत नाही. स्त्रियांचे आणि जातीव्यवस्थेचे भारतीय संदर्भ यांना सर्वांगाने भिडले जात नाही अशी खंत श्रीमती जोशी यांनी यावेळी व्यक्त केली. ●

निबंधस्पर्धा - द्वितीय क्रमांक

# माझ्या स्वप्नातील वसई

- **अंकिता सांतियाग डायस**, इ. ९ वी
सेंट जोजेफ हायस्कूल नंदाखाल

निर्भय आंदोलनच्या दशकपूर्तीनिमित्त घेतलेल्या निबंधस्पर्धामध्ये आलेल्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांचे निबंध क्रमाने प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

आम्ही रात्रीचे जेवण-खाऊन करुन झोपले असताना माझ्या स्वप्नात अचानक वसईचे दर्शन मला घडले. हिरवीगार वसई म्हणून त्या वसईचा उल्लेख करता येईल अशी ती वसई. आधुनिकीकरण, वाढता शिक्षणप्रसार, सामाजिक मूल्ये यामुळे वसईचे रुप पालटले आहे. परंतु माझ्या स्वप्नात आलेली वसई ही तुम्हांला जुन्या काळाच्या दिशेने घेऊन जाईल.

वसई ही जुन्या काळाची संस्कृती असूनसुद्धा ती ऐतिहासिकसुद्धा आहे. कारण वसईचा किल्ला ही एक मोठी महान देणगी आहे. वसईच्या किल्ल्यात पोर्तुगीज वास्तव्य करत होते. याच पोर्तुगीजांनी बांधलेला वसईचा किल्ला हा एक जुन्या काळातील अमोल ठेवा आहे. परंतु या किल्ल्याची आता पडझड झाली आहे. वसईचा किल्ला पहिल्यासारखा उरला नाही. वसईतील सुकेळी आपल्या सर्वांच्या परिचयाची असतील. त्याची चव काही निराळीच होती. जेव्हा माझ्या स्वप्नात हे चित्र आले तेव्हा माझ्या तोंडाला खूप पाणी सुटले! परंतु आता तर वसईमध्ये केळीचे झाडच उरले नाही, तर त्याला सुकेळी कशी येणार?

या वसईतील रहाट म्हणजे आपल्या जुन्या संस्कृतीने केलेली अमोल कारागिरी. मोठी विहीर व त्याला उंच मडक्यांची (बांड्याची) माळ असलेला हा रहाट. गाईचा आधार घेऊन या मडक्यातील पाणी शेतमळ्याला शिंपडले जाई. परंतु आता रहाट सारून विहीरी आल्या त्या सिमेंटच्या. वसईचा रहाट निघाला होता परदेशवारीला-विमानाने फ्रान्सला.

वसईचा टांगेवाला हा तर खूपच गमतीवान होता. कारण टांग्यात बसून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी खूपच मौज यायची. परंतु हे टांगेवाले तर मुस्लिमच बहुसंख्य असायचे आणि ख्रिस्ती लोक तुरळकच. परंतु आता तर टांगेवाला दिसतच नाही. आता तर मोटार, टॅक्सी, रिक्षा या वाहनांचीच वर्दळ, सगळीकडे गोंगाट. त्याकाळी फक्त टांगा व टांगेवाल्यांचेच राज्य होते. आता क्वचितच घोड्यांच्या टापांचा आवाज, टांगा दिसला, टांगेवाला दिसला तर तो आपल्याला जुन्या काळाकडे घेऊन जातो.

जुन्या वसईचे स्वप्न पाहत असताना माझ्या डोळ्यांसमोर अचानकच हिरव्यागार वसईचे स्वप्न रेंगाळू लागले. आजपर्यंत वसईने राबवलेला हिरव्यागार वसईच्या चळवळीला वीस वर्षे होत आहेत. परंतु आता ग्लोबल वॉर्मिंगचा विषय वाढत असल्यामुळे सर्वजण या चळवळीकडेच धाव घेतात. परंतु आता काय फायदा? आपण आपल्या पायावर कुऱ्हाड मारतो आणि नंतर पस्तावतो. आपण या हरीत वसईचे रक्षण केले पाहिजे. रोज एक ना एक तरी झाड लावले पाहिजे. तरच वसईचे सौंदर्य वाढेल. म्हणूनच

झाडे लावा, झाडे जगवा!
वसईचे सौंदर्य नटवा!!

हा संदेश माझ्या स्वप्नात आला.

ही वसई आपल्याला कधीतरी जुन्या संस्कृतीकडे घेऊन जाते. वसईमध्ये ज्याप्रकारे शेतमळे आहेत त्याप्रमाणे ही वसई फुलांच्या हिरवळीने नटली आहे. वसईमध्ये अनेक प्रकारची फुलझाडे आहेत.

माझ्या स्वप्नात आलेल्या वसईने खूप प्रगती केली आहे. आरोग्य केंद्र, रस्ते, शाळेच्या व दवाखान्याच्या सोयी इ. सुखसोयी वसईत आहेत. शेतकऱ्यांनी केलेले कष्ट ही एक वसईची संस्कृती जरी म्हटली तरी ती योग्य आहे. वसईने काळाच्या ओघात प्रगती केली आहे. परंतु वसई ही पूर्वीसारखी राहिली नाही. या वसईत खूपच बदल झाले आहेत.

वसई जरी ऐतिहासिक असली तरी ती आपल्याला जुन्या संस्कृतीकडे घेऊन जाते. वसईमध्ये भेदभाव न करता सर्वजण समानतेने राहतात. कधीतरी आपल्याला त्याचे दर्शन घडतेच. परंतु आताच्या वसईमध्ये या गोष्टी उरल्याच नाहीत. वसईने खूपच प्रगती केली आहे. वसईमध्ये सर्व धर्माचे लोक राहतात. वसईमध्ये ख्रिस्ती लोकांच्या मासिकांचेही प्रकाशन केले जाते. ही सुवार्ता सर्व जगभर पसरविली जाते. याच वसईने केलेला हा अमोल ठेवा आहे. वसईने ही आधुनिक प्रगती केली आहे.

माझ्या स्वप्नात आलेल्या वसईने मला भारावूनच ठेवले व मला एक चांगल्या प्रकारचा संदेश दिला. तो असा -

वसईला विसरू नका! वसईची जुनी संस्कृती सदैव स्मरणात ठेवा!!
अशा या संस्कृतीला आपल्या मनात सदैव रुजवून ठेवा!! •

## जोसेफीन मच्याडो यांना 'जानकीबाई परांजपे' पुरस्कार

म्युन्सिपल पेन्शनर्स असोसिएशनतर्फे वसई, पाली येथील सेवानिवृत्त शिक्षिका जोसेफीन मार्शल मच्याडो यांना 'कै. श्रीमती जानकीबाई द. परांजपे पुरस्कार' नुकताच प्रदान करण्यात आला. बृन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झाल्यानंतर त्या मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या सक्रीय सभासद झाल्या. त्यांनी वसईतील सेवानिवृत्त शिक्षिकांची संघटना मजबूत केली. संघटनेची सभासद संख्या वाढविली. पेन्शनरांचे हक्क त्यांना मिळवून दिले. वेतनधारकांना तसेच कुटुंब निवृत्तीधारक यांच्याकरीता मुंबई महानगरपालिकेतर्फे महागाई भत्ता मिळवून दिला. एका सेवानिवृत्त शिक्षिकेच्या मृत्यूनंतर तिच्या मूकबधीर मुलासाठी परिश्रम घेऊन फॅमिली पेन्शन मिळवून दिले. त्यांच्या या कार्याची नोंद घेऊन त्यांना सदर पुरस्काराने गौरविले आहे. निर्भय परिवारातर्फे अभिनंदन.

# बॅसीन कॅथॉलिक बँकेला ५९ कोटीचा नफा

## मरोळ व वाशी येथे नव्या शाखा

**वसई :** नागरी सहकारी बँकात अग्रगण्य असलेल्या बसीन कॅथोलिक बँकेला यावर्षी ५९ कोटी रुपये नफा झाला आहे. बँकेच्या ठेवी १९१८ कोटी, कर्ज वितरण १२०५ कोटी, स्वनिधी २२९ कोटी झाले आहे.

नुकताच बँकेच्या मरोळ शाखेचे उद्घाटन राज्याचे आरोग्य, पर्यावरण व क्रिडा मंत्री सुरेश शेट्टी यांच्या हस्ते झाले. ग्रामीण भागातील नावारूपाला आलेली बँक शहरात आल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी स्थानिक आमदार अशोक जाधव उपस्थित होते. होली फॅमिली हायस्कूलचे प्राचार्य फा. फ्रान्सिस स्वामी यांनी आशिर्वादीत केले. ठाणे, भाईंदर, मिरारोड, बोईसर, वाशी, मरोळ अशा वसईबाहेर बँकेच्या शाखा आहेत.

## संत जोजेफ पतपेढीला १.६४ कोटी नफा

**वसई :** वसईतील संत जोजेफ सहकारी पतपेढीला यावर्षी १.६४ कोटी रुपये नफा झाला आहे. पतपेढीच्या ठेवी ९२ कोटी झाले असून ५७ कोटी कर्ज वितरण झाले आहे. संस्थेचा स्वनिधी ५ कोटी इतका झाला आहे. पतपेढीच्या ४ शाखा आहेत.

## साधना पतपेढीला १.५२ कोटी नफा

**वसई :** वसईतील साधना सहकारी पतपेढीला यावर्षी १.५२ कोटी रुपये नफा झाला आहे. पतपेढीच्या ठेवी ५५ कोटी झाले असून २१ कोटी कर्ज वितरण झाले आहे. संस्थेचा स्वनिधी ६.३४ कोटी इतका झाला आहे. संस्थेच्या ३ शाखा आहेत.

## सिसिलिया कार्व्हालो यांच्या पुस्तकाला पुरस्कार

ख्रिस्ती साहित्य प्रसारक या पुण्यातील संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त संस्थेने मराठी साहित्य क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या सुप्रसिद्ध साहित्यिका कवयित्री डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांच्या 'ज्ञानवृक्षाची पालवी' या आस्वादनपर ग्रंथाला डी. पी. ॲण्ड्र्यूज स्मृती पुरस्कार देण्यात आला. डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचे निर्भय परिवाराच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

## जीवेत् शरद् शतम्

**९०व्या वाढदिवसानिमित्त**
**हार्दिक अभिनंदन!**

# फिलीप जॉन मच्याडो

**( मशाद गुरूजी )**



**जन्म : २४-५-१९२०**

**जेष्ठ समाजवादी आणि समाजशिक्षक**
**नंदाखाल, ता. वसई**

## अभंग बालक-पालक मेळावा

# अभंग मुलांच्या शिक्षिका मातेसमान - अनिल थत्ते

**वसई :** अभंग मतिमंद मुलांना शिकवणाऱ्या शिक्षिका त्यांच्यांत इतक्या गुंतून पडल्या आहेत की त्या त्यांच्या माता बनल्या आहेत. इथे व्यवहार नाही, पैसा नाही. सारा मामला प्रेमाचा-मायेचा आहे. आपण एका नव्या विश्वात आलो आहोत. मेरी घोन्सालविस आणि कॅरल डिमेलो या मतिमंद मुलांच्या मातांचे मनोगत ऐकून आपण सद्‌गदीत झालो. आपण आपल्या 'गगनभेदी गप्पा'त आजचा अनुभव सर्वत्र कथन करु असे भावपूर्ण प्रतिपादन 'गगनभेदी'कार अनिल थत्ते यांनी अभंग भवन येथे भरलेल्या अभंग मतिमंद मुलांच्या बालक-पालक मेळाव्यात बोलतांना केले. माझ्या आयुष्यात आजचा अनुभव घ्यायला आपल्याला उशीर झाला असे उद्‌गार त्यांनी काढले. थत्ते यांनी सादर केलेल्या कार्यक्रमाचे मानधन घेतले नाही उलट अभंग मुलांसाठी स्वत:चे १,१००/- रुपये ते देऊन गेले.

अस्थिव्यंगाचे मेळावे दरवर्षी भरतात तसेच विशेष (अभंग मतिमंद) मुलांचे बालक-पालक मेळावेसुद्धा भरविले जातात. नव्याने उभी राहिलेली अभंग भवनाची वास्तू उभारण्यासाठी अनेकांचे हातभार लागले आहेत. आता डोंबिवली लायन्स क्लब अभंग मुलांसाठी खेळण्याचा पार्क बनवून देत आहे असे फा. मायकल जी यांनी सांगितले.

कार्यक्रमात सेंट ॲलोशस डी.एड्. कॉलेज व पुष्पांजली बी.एड्. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी स्पेशल बालकपालकांचे खेळाद्वारे मनोरंजन केले व पालकांच्या मुलाखती घेऊन स्वत: स्पेशल मुलांचा जवळून अभ्यास करून घेतला. अभंग स्कूलच्या मुलांनी मोर नृत्य तर नाझरेथ स्कूलच्या एका मुलीने एक सुंदर नृत्य सादर केले. फिजिओथेरापिस्ट सौ. मनिषा भिमाणी ह्यांनी लॅपटॉपच्या साहाय्याने मुलांच्या बौद्धिक पातळ्या ओळखून त्याप्रमाणे त्यांच्याशी कसे वागावे, ह्याचे पालकांना मार्गदर्शन केले. त्यांच्याच हस्ते मेळाव्यात घेतलेल्या खेळांची बक्षिसे देण्यात आली. शिक्षिका शैला घोन्सालविस व डेल्मा चौधरी ह्यांचा सत्कार करण्यात आला. स्पेशल मुलांनी बनविलेली पायपुसणी तसेच माऊंटनब्रू चहा पावडर विक्रीसाठी ठेवली होती.

अनिल थत्ते यांनी आपला महाराष्ट्रात गाजलेला 'गगनभेदी गप्पा' हा कार्यक्रम सादर केला. 'वयाची चाळीस वर्षे मी पत्रकारिता करूनदेखील माझी बायको मात्र वर्तमानपत्र कधीच वाचत नाही' असे सांगून आजची पत्रकारिता कशी बंडलबाज व भ्रष्ट झाली आहे त्याचे आखोदेखे किस्से सांगून श्रोत्यांची हसून पोटे दुखविली. तसेच राशिभविष्य आणि साधूबाबांच्या प्रार्थना सभा आयोजित करणे कसा कार्पोरेट धंदा झाला आहे त्याची प्रात्यक्षिके व अनुभव सांगून त्यांची भोंदुगिरी चव्हाट्यावर आणली.

अपंगसेवाच्या संचालिका सिंथिया बॅप्टिस्टा यांनी आभार मानताना अभंग भवन दूरवर असून कार्यक्रमाला बऱ्यापैकी उपस्थिती नोंदवल्याबद्दल श्रोत्यांचे विशेष आभार मानले. जॅक गोम्स ह्यांनी सूत्रसंचालन केले. •

---

**प्रेमळ स्मृती**

# स्व. एलिस मोत



**जन्म : १६-८-१९३१**

**मृत्यू : १९-४-२०१०**

**- पत्नी व मुले : जेरोम, जॉन, विन्सेंट, सि. गोरेत्ती**

**मेढे, वटार, नंदाखाल, ता. वसई.**

# जनता दलाचा भव्य मेळावा

## डॉमनिक घोन्सालविस यांची साथ आश्वासक - प्रा. शरद पाटील

**वसई :** वसई-विरार महानगरपालिका विरोधात २००६ पासून आणि मागील २० वर्षापासून जनतेच्या विविध प्रश्नांवर जनता दलाने केलेली आंदोलने लोक विसरले नाहीत. जनतेसाठी लढणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांचा हा पक्ष आहे. जनता दलाचे आमदार म्हणून प्रभावी केले. समाजवादी परिवराने प्रा. स. गो. वर्टी, पंढरीनाथ चौधरी, डॉमनिक घोन्सालविस असे आमदार दिले. त्या काळात आमदार फंडातून कच्च्या बीदीचे डांबरी रस्ते करणारे ते एकमेव आमदार होते. धर्मनिरपेक्षता, सामाजिक सौहार्द आणि समतेचा विचार फक्त समाजवादी

काम केलेले आमदार डॉमनिक घोन्सालविस आता आपल्या बरोबर आले आहेत. त्यांचे पक्षात सक्रिय होणे आनंददायी आहे. या पुढचे लढे त्यांच्याच आशिर्वादाने होतील आणि वसई तालुक्यातील समाजवादी परिवाराला जुने वैभव पुन्हा प्राप्त होईल. वसईत ठाकूरविरुद्ध जनता दलच प्रामाणिकपणे लढले आहे. आता सर्व मिळून ठाकूरशाही उखडून लावा असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश जनता दलाचे अध्यक्ष प्रा. शरद पाटील यांनी वसई येथे जनता दलाच्या कार्यकर्ता मेळाव्यासमोर अध्यक्षपदावरून बोलताना व्यक्त केले.

वसई तालुका जनता दलाचा कार्यकर्ता मेळावा सागरशेत येथील म. वि. कुळकर्णी स्मारक आवारात संपन्न झाला. यावेळी वसई तालुका जनता दलाचे अध्यक्ष पिटर फर्नांडीस व नवीन कार्यकारिणी जाहिर करुन त्यांचा सत्कार करण्यात आला. मनवेल तुस्कानो, पी. पी. राऊत, ॲड. पी. एन. ओझा, विकास विचारे, आल्बर्ट कुलास, व्हेलेरियन घोन्सालविस यांची सल्लागार समितीही जाहिर करण्यात आली.

यावोळी बोलताना माजी आमदार डॉमनिक घोन्सालविस म्हणाले, मी पुन्हा माझ्या समाजवादी परिवारात कार्यरत झालो आहे. बॅ. नाथ पै, प्रा. मधु दंडवतेंनी महाराष्ट्राला कोकण रेल्वे दिली. जनता दलाने विरार-बोरीवली चौपदरी मार्गासाठी आंदोलने केली. येत्या निवडणूकीत आपण जनता दलाच्या उमेदवारांच्या मागे राहू असे त्यांनी जाहिर केले. समाजवादी विचार मी सोडलेला नाही असेही ते म्हणाले.

प्रास्तविक भाषण प्रदेश महासचिव मनवेल तुस्कानो यांनी परिवाराने दिला आहे. जनता दलाकडे निष्ठावान-प्रामाणिक कार्यकर्ते आहेत. या सर्वांना बरोबर घेऊन जनता दलाची गुढी आम्ही पुन्हा नव्याने उभारत आहोत त्याला जनतेने साथ द्यावी असे आवाहन त्यांनी केले.

पक्षाचे नवे अध्यक्ष पिटर फर्नांडीस यांनी जुन्या-नव्या समाजवादी कार्यकर्त्यांना एकत्र आणून पक्ष बांधणी करण्याचा व पक्षासाठी ५ लाख रुपयाचा निधी उभा करण्याचा निर्धार व्यक्त केला. एसेम, नानासाहेब गोरे, मधू दंडवते यांना आदर्श मानणारे सर्व कार्यकर्ते जनता दलात सक्रिय होतील अशी अपेक्षा फर्नांडीस यांनी व्यक्त केली.

प्रदेश जनता दलाचे महासचिव जेष्ठ पत्रकार प्रभाकर नारकर यांचे भाषण झाले. भय-भूक-भ्रष्टाचार ही काँग्रेसने राज्याला दिलेली भेट असून तथाकथित विकासाच्या नावाखाली काँग्रेस दडपशाही करत आहे. पक्षाचे कार्यालयीन महासचिव वसंत शिराळी यांचेही यावेळी भाषण झाले. जेष्ठ समाजवादी नेते पिटर डिसिल्वा यांचे यावेळी भाषण झाले. सुत्रसंचालन, आभार प्रदर्शन व्हेलेरियन घोन्सालविस यांनी केले. निळकंठ पाटील, पी. पी. राऊत, आल्बर्ट कुलास, किरण सेठ, उदय सामंत, जोनस फरेरा ही जेष्ठ मंडळी व्यासपिठावर होती. या मेळाव्यासाठी वसईच्या सर्व भागांतून मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. जुन्या-नव्या समाजवादी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्त्यांत चांगला उत्साह निर्माण झाला. इजाबेल फुर्ट्याडो, चिंतामण राऊत, राजाभाऊ वाडीवकर, यज्ञेश्वर पाटील, फ्रेड्रीक परेरा आदि मान्यवर मेळाव्याला उपस्थित होते. ●

# संयुक्त महाराष्ट्र सत्याग्रहींचा सत्कार

## सुवर्ण महोत्सवाबरोबरच वास्तवाचे पोस्टमॉर्टेमसुद्धा व्हावे - फा. मायकल जी.

**सोपारा :** संयुक्त महाराष्ट्र मिळविण्यासाठी मोठी किंमत मोजावी लागली. एसेम जोशी, सेनापती बापट, आचार्य अत्रे, सी.डी. देशमुख अशा मान्यवरांनी अहिंसेच्या मार्गातून हे आंदोलन पुढे नेले व यशस्वी केले. पण त्याची जाणीव आज नव्या पिढीला नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या दिवसात मुंबईत ५२% मराठी माणसे होती ती आता २२% इतकी खाली का आली याचे चिंतन झाले पाहिजे. यासाठी सर्व प्रकारची कामे करणारे मराठी माणसांचे मनुष्यबळ निर्माण करण्याची गरज आहे असे प्रतिपादन जेष्ठ पुरोगामी विचारवंत फा. मायकल जी यांनी सोपारा येथे जनहीत मंचतर्फे आयोजित केलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील सत्याग्रहींच्या सत्कारप्रसंगी बोलताना केले. अध्यक्षस्थानी मंचचे अध्यक्ष नितीन शेलार होते.

जनहीत मंचतर्फे बुऱ्हाणचौक, सोपारा येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत २७ दिवस साबरमतीच्या जेलमध्ये हालअपेष्टा काढलेल्या हरिभाऊ पेंढारी, सुरेंद्र हटकर, मनोहर बळवंत पाटील व दामोदर राऊत यांच्या पत्नी यांचा सत्कार महाराष्ट्र प्रदेश जनता दलाचे महासचिव मनवेल तुस्कानो व फा. मायकल जी, विकास विचारे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी बोलताना तुस्कानो म्हणाले, संयुक्त महाराष्ट्र मिळविण्यासाठी चिंतामणराव देखमुख यांनी आपले अर्थमंत्रीपद भिरकावून दिले होते. ते आदर्श आता सत्तेचे दलाल कधीच विसरले आहेत. प्रांतवाद, भाषावाद, धर्मवाद यामध्ये राज्याचे सौहार्द हरवले आहे. अशा परिस्थितीत नव्या पिढीने संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील नामवंत नेत्यांचे आदर्श पुढे ठेऊन निष्ठेने कार्य करावे. जनहीत मंचचे अध्यक्ष नितीन शेलार यांनी यावेळी सत्कारार्थींचे गौरव करणारे भाषण केले. सत्काराला उत्तर देताना हरिभाऊ पेंढारी म्हणाले, साबरमतीच्या जेलमध्ये खाली वाळू व वर पत्र्यामुळे ऊन्हाचे चटके व कोंड्याच्या भाकरी खाण्यापिण्याची प्रचंड आबळ अशा परिस्थितीमध्ये आम्हांला उपाशी राहून दिवस काढावे लागले. त्यांच्या आठवणी हृदय पिळवटणाऱ्या होत्या. प्रास्तविक भाषण विकास विचारे यांनी केले.

---

## फेबियन डिसिल्वाला कराटेमध्ये सुवर्ण पदक

**वसई :** ऑल इंडिया कराटे असोशियनतर्फे नुकत्याच झालेल्या १४ वर्षाखालील कराटे स्पर्धेमध्ये गोवा येथे पापडीच्या सेंट ॲलॉयसिस शाळेत आठवी इयत्तेत शिकणारा विद्यार्थी फेबियन याने सुवर्ण व रौप्य पदक अशी दोन पारितोषिके मिळविली. शिक्षणाबरोबर कु. फेबियन याने कराटे खेळामध्ये जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर प्राविण्य मिळविले. त्यांचे निर्भय परिवाराच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

---

# जिल्हा परिषदेची शाळा बिल्डरने पाडली

## जनहित मंचच्यावतीने उपोषण व धरणे

**नालासोपारा :** नालासोपारा पश्चिमेकडील उड्डाणपूलाशेजारी जिल्हा परिषद मराठी शाळेची इमारत होती. खाजगी बिल्डरने ती पार्किंगच्या व्यवस्थेसाठी जमीनदोस्त केली. या बिल्डरला पाठिशी घालण्याचे काम अधिकाऱ्यांनी करुन शाळेची इमारत बांधण्याच्या कामात अक्षम्य अशी दिरंगाई चालवली आहे. याचा निषेध करण्यासाठी, शाळेच्या पुर्ननिर्माणाचे काम लवकरात लवकर व्हावे म्हणून जनहित मंचच्या वतीने एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण व नागरिकांच्या सह्यांची मोहिम राबविण्यात आली.

ही इमारत पाडणाऱ्या बिल्डरवर फौजदारी गुन्हा दाखल करावा. शाळेच्या पूर्वीच्याच जागी नवीन इमारत लवकरात लवकर बांधावी. शाळेचे बांधकाम पूर्ण होईपर्यत सदर जागेला कुंपण घालण्यात यावे. यासाठी दिरंगाई व चालढकल करणाऱ्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. नालासोपारा शहरातील जिल्हा परिषद मालकीच्या अन्य प्राथमिक शाळांच्या दुरावस्थेकडे तातडीने लक्ष घालून विद्यार्थ्यांसाठी सर्व आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यात याव्या अशा मागण्यांचे निवेदन शिक्षण अधिकाऱ्यांना देण्यांत आले.

या आंदोलनास वसई तालुका जनता दलाचे अध्यक्ष ॲड. पिटर फर्नांडीस, निर्भय जन मंचचे महासचिव पायस मच्याडो, मानव अधिकार फाऊंडेशनचे नरेंद्र बाईत, विरार जनता दलाचे अध्यक्ष जितेंद्र सत्पाळकर, सेक्रेटरी अल्ताफ शेख, माजी जिल्हापरिषद सदस्य समीर वर्तक, सिल्वेस्टर परेरा आदिंनी उपोषण स्थळी भेट देऊन पाठिंबा दिला. या उपोषणात जनहित मंच अध्यक्ष नितीन शेलार, उपाध्यक्ष विकास विचारे, गौतम खंडागळे, एस. आर. खान, निलेश म्हात्रे, मनोज राऊत, स्वाती कोरगांवकर, राजू विचारे, राहुल पेंढारी, नेहा शेलार आदी अनेक कार्यकर्त्यांनी भाग घेतला.

---

# एस.टी. सुरू केल्याबद्दल धन्यवाद!

सत्पाळे-विरारसाठी बंद पडलेली एस. टी. पुन्हा सुरू केल्याबद्दल निर्भय जन मंचाचे आम्ही महिला आभार मानतो. बस ही काळाची गरज बनली होती. एस. टी. बस आम्हा स्त्रियांना सुरक्षित आहे. कुणालाही धोका वाटत नाही. पैसेसुद्धा ठरलेल्या दराप्रमाणे. लोकांनी अनेक प्रकारच्या वाहनांचा वापर केला पण आता सर्वांना कळून चुकले आहे. एस. टी. शिवाय प्रवाशांचे हाल कसे होतात ते अनुभवले. खूप त्रास सहन केल्यामुळे सर्वांच्या तोंडून येत होते एस. टी. सुरू झाली तर बरे होईल. आम्हा स्त्रियांचे हाल पाहून निर्भय जन मंचला कळवळा आला आणि आमच्यासाठी बस सुरू केली. त्याबद्दल मी सर्व महिलांच्या वतीने नेते मंडळींचे आभार मानते. तसेच एस. टी. अधिकारी भोसलेसाहेब लक्ष देऊन एस. टी. बस वेळेवर सोडतात. त्यामुळे आता सर्वांच्या तोंडावर आनंद दिसतो. म्हणून आपण सर्व बंधू-भगिनी एस. टी.ने प्रवास करुया!

– **कोशाव लोबो**, पडई

## कमलताईंच्या 'जय हो' आत्मचरित्राचे प्रकाशन

# चांगल्या प्रवृत्ती एकत्र येण्याची गरज - आर. आर. पाटील

**मुंबई :** सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर आंदोलने करुन त्यांना कसा न्याय मिळवून देता येतो, प्रसंगी राजसत्ताही कशी उलथवून टाकता येते, ते कमलताईंनी दाखवून दिले आहे. अन्यायाच्या विरोधात लढण्याची प्रेरणा हे पुस्तक देते. पुराणकाळापासून ते आत्तापर्यंतच्या राजवटी पाहिल्या तर चांगले आणि वाईट अशा दोन्ही प्रवृत्तींची माणसे आपल्याला दिसून येतात. हा संघर्ष वर्षानुवर्षे सुरू आहे आणि यापुढेही सुरूच राहणार आहे. समाजात चांगल्या प्रवृत्तीची माणसे आजही मोठ्या संख्येत असून त्यांनी एकत्र येण्याची गरज आहे. पोलिसांनी ज्यांच्या मागे बेड्या घेऊन धावले पाहिजे, अशी मंडळी आज लोकसभा आणि विधानसभेत निवडून येत आहेत. आज निवडणुकीत जात, धर्म, पैसा आणि गुंड यांना महत्व आले असल्याची खंत राज्याचे गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी जेष्ठ समाजवादी नेत्या कमलताई देसाई यांनी लिहिलेल्या 'जय हो' या आत्मचरित्राच्या प्रकाशन प्रसंगी व्यक्त केली. अध्यक्षस्थानी जेष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य होते.

आपल्या नव्वदीच्या वयात आपण कधी निराश झालो नाही किंवा कामाचा कंटाळा केला नाही. नैराश्याचा स्पर्श माझ्या मनाला होऊ दिला नाही. आपले आईवडील धार्मिक प्रवृत्तीचे होते पण आपण धर्म निरपेक्ष वृत्तीने काम करत राहिलो. दुर्बळ-दलित जनतेतच मला देव दिसतो. त्यांच्या सेवेत माझा धर्म आहे. नव्या पिढीने नैराश्य झटकून कामाला लागावे असे आवाहन जेष्ठ समाजवादी नेत्या माजी आमदार कमलताई देसाई यांनी लिहिलेल्या 'जय हो' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात बोलताना केले.

अ. भि. गोरेगावकर हायस्कूल येथील सभागृहात झालेल्या कार्यक्रमात कमलताई देसाई यांनी लिहिलेल्या 'जय हो' या आत्मचरित्राचे प्रकाशन गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या हस्ते झाले. माजी गृहराज्यमंत्री भाई वैद्य अध्यक्ष तर जेष्ठ समाजवादी नेत्या मृणाल गोरे, 'आयबीएन-लोकमत' वृत्तवाहिनीचे संपादक निखिल वागळे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. हे पुस्तक 'ग्रंथाली'ने प्रकाशित केले आहे. प्रत्येक ५ वृक्ष लागवड, कुटुंब नियोजन, ५ जणांची साक्षरता आणि अन्यायाविरूद्ध आवाज उठविण्यासाठी लोकांनी पुढे आले पाहिजे असे कमलताई यावेळी बोलताना म्हणाल्या.

राजकीय, सामाजिक, कला, लोककला क्षेत्रातील मान्यवर व्यक्तीने तसेच कोणत्याही चलवळींमध्ये काम करणाऱ्या अगदीसर्वसामान्य कार्यकर्त्यांनेही आपले आत्मकथन जरुर लिहावे. हे लेखन म्हणजे त्या व्यक्तीच्या जीवनचरित्राबरोबरच त्या काळाचा सामाजिक, राजकीय इतिहास असतो. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीचे राजकीय मतभेद विसरून मुद्रित, ध्वनिचित्रमुद्रित स्वरुपात त्याचे संदर्भीकरण केले जावे, अशी अपेक्षा आयबीएन लोकमतचे संपादक निखिल वागळे यांनी व्यक्त केली. सध्याचे सत्ताधारी आणि विरोधक हे दोघेही जनतेपासून तुटले असून त्यांच्यावर अंकुश ठेवण्याकरिता आज पुन्हा एकदा सामाजिक व राजकीय आंदोलने होण्याची गरज निर्माण झाली असल्याची अपेक्षाही वागळे यांनी व्यक्त केली.

आपला देश हा शेतीप्रधान असतानाही आपण जागतिकीकरणाची व बाजारधिष्ठीत अर्थव्यवस्था का स्विकारली, सत्ताधाऱ्यांबरोबर विरोधकानांही ते मान्य होते का असा सवाल करुन अध्यक्षपदावरून बोलताना भाई वैद्य म्हणाले की, त्यामुळेच शिक्षण, आरोग्य हे महाग झाले असून शेतकरी आत्महत्या करत आहे. समाजात असणाऱ्या अपप्रवृत्ती, राजकीय पक्ष आणि नेत्यांची सर्वसामान्यांपासून तुटलेली नाळ आदींबाबत सर्वसामान्य जनता गप्प आहे असे वाटत असले तरी ही जनता एक ना एक दिवस उठाव करुन राजकारण बदलल्याशिवाय राहणार नाही. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. •

# वसई तालुका जनता दलाच्या अध्यक्षपदी पिटर फर्नांडीस

## जुन्या-नव्या समाजवाद्यांना एकत्र आणणार

वसई : वसई तालुका जनता दलाच्या अध्यक्षपदी पिटर फर्नांडीस यांची निवड करण्यात आली. प्रदेश महासचिव मनवेल तुस्कानो यांच्या अध्यक्षतेखाली निर्मळ येथील इमेज हॉलमध्ये झालेल्या कार्यकर्त्यांच्या सभेत एकमताने त्यांची निवड झाली. तालुक्यातील सर्व जुन्या-नव्या समाजवादी कार्यकर्त्यांना एकत्र आणून आजच्या परिस्थितीत शांतता, सौहार्दाचे राजकारण तालुक्यात पुन्हा सुरू व्हावे अशी भावना अनेक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

पिटर फर्नांडीस वसई शहर जनता दलाचे अध्यक्ष होते. कामगार चळवळीत त्यांचे योगदान आहे. बांधिलकी मासिकाचे ते संपादक आहेत. आर्थिक आणि कायदा क्षेत्रातील ते जाणकार आहेत. सहकारी क्षेत्राचे त्यांना चांगले ज्ञान आहे. वसई तालुक्यातील महानगरपालिका, आराखडे, गुन्हेगारी विरोधात पक्षाने आयोजित केलेल्या चळवळी आंदोलनात त्यांचा सहभाग होता.

निर्मळ येथे झालेल्या सभेत पॅट्रीक फर्नांडीस, आल्बर्ट कुलास, निमेश वसा, जॉन परेरा, ॲड. पी. एन. ओझा, व्हेलेरियन घोन्सालविस, दिनेश सामंत, जितेन्द्र सत्पाळकर, शिवाजी मोरे, पायस मच्याडो, नितीन शेलार, विकास विचारे, सायमन डायस आदि कार्यकर्त्यांनी आपले विचार मांडले.

## जोसेफ फरगोज यांचे निधन

**गास :** जुन्या काळातील महसूल अधिकारी व समाजवादी विचाराचे जोसेफ लॉरेन्स फरगोज यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९० वर्षे होते. त्यांच्या मागे २ मुलगे, ४ मुली असा परिवार आहे. निर्भय परिवाराचे प्रमुख कार्यकर्ते ग्रेगरी फरगोज यांचे ते चुलते होत.

## फा. पिटर बोंबाचा यांची निघृण हत्या

**वसई :** हजारो गोरगरिबांचे दुःख निवारण करणारे, रोग्यांना औषधोपचार करणारे व ताणतणावामुळे नैराश्य आलेल्या लोकांना जीवनाचा मार्ग सांगणारे सर्वधर्मिय सर्व समाजाच्या लोकांचे आशास्थान बनलेले फा. पिटर बोंबाचा यांची निघृण हत्या झाली. मृत्यूसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. भाबोळा येथील त्यांच्या आश्रमात त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी हजारो सर्वधर्मिय लोकांचा जमाव जमला होता. सेंट पिटर चर्च, पाचूबंदर येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अशा प्रकारच्या हत्येने सारा परिसर हळहळला. पोलीस याबाबत चौकशी करत असून अजूनपर्यंत गुन्हेगारांचा तपास लागला नाही. फा. बोंबाचा यांच्या निधनामुळे एका चांगल्या धर्मगुरूचा अशाप्रकारे शेवट व्हावा याची खंत असंख्य लोकांनी व्यक्त केली.

## दत्ता नर यांना मातृशोक

**वसई :** वसई संघर्ष समिती व काँग्रेसचे जिल्हा समन्वयक दत्ता नर यांच्या मातोश्री द्रौपदी सीताराम नर यांचे नुकतेच अल्प आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७८ वर्षे होते. त्यांच्या मागे २ मुलगे, ४ मुली, नातवंडे असा परिवार आहे.

## एलिस मोत यांचे निधन

**नंदाखाल :** नंदाखाल परिसरातील सामाजिक कार्यकर्ते व प्रगत शेतकरी एलिस मोत यांचे नुकताच दिर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७८ वर्षे होते. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुलगे, १ मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची कन्या सिस्टर आहेत. विविध सामाजिक कार्यात मोत यांचा सहभाग होता. त्यांच्या घरी झालेल्या शोकसभेत त्यांच्या अनेकांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

## फिलीप दिब्रिटो यांचे निधन

**नंदाखाल :** सेंट जोजेफ हायस्कूल, नंदाखालचे शिक्षक फिलीप दिब्रिटो यांचे आकस्मिक निधन झाले. ते आजारी होते. सकाळी अर्नाळा येथे मॉर्निंगवॉकसाठी गेले असताना रस्त्यात त्यांना मृत्यू आला. मृत्यूसमयी त्यांचे वय ५४ होते. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

## दुमीबाई परेरा यांचे निधन

**नंदाखाल :** येथील पत्रकार जॉन परेरा व काँग्रेस कार्यकर्ते विन्सेंट परेरा यांच्या मातोश्री दुमीबाई लुईस परेरा यांचे नुकताच दिर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७८ वर्षे होते. त्यांच्या मागे ४ मुलगे, २ मुली असा परिवार आहे.

## कुमार राऊत यांना मातृशोक

**सोपारा :** जनता दलाचे आणि शुर्पारक क्रिडा मंडळाचे कार्यकर्ते कुमार राऊत यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई पांडुरंग राऊत यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८० वर्षे होते. त्यांच्या मागे पती, २ मुलगे, ३ मुली, नातवंडे असा परिवार आहे.

*With Best Compliments From :*

# MODI MOTORS AGENCIES PVT. LTD.

HYUNDAI AUTHORISED DEALERS THANE

Models : Santro Xing, I-10, I-20, Verna, Accent

S.C. AUTO CORPORATION

CM-Chevrolet Authorised Dealer Thane

Model : Spark, Captiva, Aveo, Tavera, Beat

VASAI SHOWROOM

Cont. RAPHAEL LOPES

Vishwakarma Nagar, Ambadi Rd., Vasai (w).

Ph. : 2343825 • Mobile : 9890238284

# मशाद गुरूजी ९० वर्षाचे झाले

**नंदाखाल :** वसई तालुक्यातील जुने जाणते समाजवादी नेते फिलीप जॉन मच्याडो (मशाद गुरूजी) हे २४ मे २०१० रोजी ९० वर्षाचे होतील. प्रा. स. गो. वर्टी, डॉ. मधुकर परुळेकर, पंढरीनाथ चौधरी, डॉ. भाई सामंत अशा जेष्ठ समाजवादी नेत्यांबरोबर त्यांनी कार्य केले. ते कोफराड ग्रामपंचायतीचे सरपंच होते. १९२० साली जन्मलेले मशाद गुरूजी स्वातंत्र्य चळवळीचे साक्षीदार आहेत तसेच तीन पिढ्यांचे शिक्षक होते.

नंदाखाल परिसरात शिक्षणाचा पाया घालण्यात त्यांचे योगदान आहे. जुन्या काळात साधनसामुग्री अभावी खूपच गैरसोयी होत्या. आजच्या सारखा निधी नव्हता. त्या काळात त्यांनी सरपंच म्हणून चांगले काम केले. १९५२, १९५७ पासूनच्या सर्व निवडणूकात ते सक्रीय राहिले. प्रजा समाजवादी पक्ष, समाजवादी पक्ष, जनता पक्ष, जनता दल अशा समाजवादी मुल्याशी ते आतापर्यंत एकनिष्ठ राहिले आहेत. स्पष्टवक्तेपणा आजच्या काळात रुचत नाही. पण जे आहे ते स्पष्ट शब्दात ते सांगत असतात.

समाज सेवा मंडळात त्यांनी कार्य केले. सायमन लोपीस, सायमन कोरीया आणि फिलीप मच्याडो या समाजवादी त्रिमूर्तीने नंदाखाल येथे सन्मित्र स्टोअर्स सुरू केले होते. पण त्यातही व्यापाराऐवजी समाजाची कणव अधिक असल्याने ते चालले नाही. पण या समाजवादी त्रिमूर्तीने आपला समाजवादी वसा सोडला नाही. ●

# ॲलोशियस परेरा शासकीय समितीवर नियुक्त

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि नियम १९६१ मध्ये दुरूस्त्या, बदल आणि सुधारणा करण्यासाठी शासनाला सूचना देण्यासाठी राज्यशासनाने सहकार क्षेत्रातील आणि वित्त संस्थातील नामवंत व्यक्तिंची समिती नेमली आहे. या समितीवर रिझर्व बँकेचे सेवानिवृत्त मुख्य महाव्यवस्थापक आणि बॅसीन कॅथोलिक को-ऑप. बँकेचे सल्लागार संचालक ॲलोशियस परेरा यांची नियुक्ती झाली आहे. ही समिति सहकारी कायद्यात करायच्या व्यापक सुधारणाचा मसुदा राज्यशासनास तीन महिन्यात सादर करील. ह्याबाबतीत ज्यांना काही सूचना करावयाच्या असतील त्यांनी त्या श्री. परेरा यांच्याकडे किंवा आमच्याकडे लवकरात लवकर पाठवाव्यात.

ॲलोशियस परेरा यांनी रिझर्व बँकेच्या नागरी सहकारी बँक विभागाचा कार्यभार उत्तमरित्या सांभाळला होता. नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व बँकेची महत्वाची धोरणे (पॉलिसी) ठरविण्यासाठी केंद्रिय तथा मुंबई विभागीय कार्यालयात त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. मोठ्या नागरी सहकारी बँकांसाठी प्रशिक्षण देणे आणि बँकांची तपासणी करण्याचे काम ते करीत होते. रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर वाय. व्ही. रेड्डी यांचेबरोबर वित्तसंस्थासाठी नियमावली तयार करणाऱ्या कमिटीत त्यांनी काम केले आहे. आज ही श्री. परेरा यांना विविध बँका मार्गदर्शन करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण व सल्ला देण्यासाठी पाचारण करतात. ●

# पॅट्रीक डिसिल्वा समाजवादी बांधिलकीची ७५ वर्षे!

जेष्ठ समाजवादी नेते पॅट्रीक डिसिल्वा यांनी नुकतीच दि. १७ मार्च रोजी आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण केली. ९ ऑगस्ट १९४२ रोजी गवालिया टँक येथे 'चले जाव'च्या आंदोलनात अटक झालेले होळभाट गावातील ए. जे. डिसिल्वा व ए. पी. डिसिल्वा या युवकांनी राष्ट्रप्रेमाने प्रेरित होऊन १९४८ साली होळी पान मार्केट येथे राष्ट्र सेवा दलाची शाखा सुरू केली. त्याकाळी डॉ. म. ग. परुळेकर, प्रा. वर्टी सर, शाहीर लीलाधर हेगडे मार्गदर्शनासाठी शाखेत येत असत. त्यांच्याबरोबर पिटर डिसिल्वा आणि पॅट्रीक डिसिल्वा सहभागी झाल्याने त्यांची वैचारिक जडणघडण होत गेली व ते कट्टर समाजवादी बनले.

१९५२ च्या वर्टी सरांच्या निवडणूकीपासून ते कार्य करत होते. पक्षासाठी पोस्टर्स लावणे, भिंती रंगविणे पासून सर्व कामे निष्ठेने करणारा एक हाडाचा कार्यकर्ता अशी त्यांची ओळख होती. १९८८ साली माजी आमदार डॉमणिक घोन्सालविस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या 'रेल्वे चौपदरीकरण' आंदोलनात रेल्वे पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीमारात ते गंभीर जखमी झाले होते. समाजवादावर अढळ श्रद्धा व कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता पक्षाशी व आता जनता दलाशी शेवटपर्यंत जपलेली एकनिष्ठता हे माझ्या जीवनाचे 'संचित' आहे असे ते मानतात.

पॅट्रीक डिसिल्वा हे उत्तम क्रिकेटपटू होते. १९६० ते २००३ पर्यंत ते वसई तालुका क्रिकेट टूर्नामेंटचे सेक्रेटरी होते. १९५६-५७ साली खंडित झालेली तालुक्यात क्रिकेट टूर्नामेंटची मालिका पुन्हा सुरू करण्यात डिसिल्वा सोबत पी.टी. गव्हाणकर, सदा मसुरकर, डी.एम.पाटील, चंदु नाईक यांचा मोलाचा वाटा होता. डिसिल्वा हे उत्तम ब्रिजपटूदेखील आहेत. २००० साली आंतरराज्य ब्रिज स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी त्यांना लाभली होती. डिसिल्वा ह्यांच्या अमृत महोत्सवानिमित्ताने वसईतील चिमाजी आप्पा क्रिडा भवनात ब्रिज स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यात महाराष्ट्रातील अनेक ब्रिजपटू सहभागी झाले होते. ●